रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ६३
www.ramprahar.com

सोमवार, १८ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## आजपासून संसदेचे विशेष अधिवेशन; नव्या भवनावर ध्वजारोहण



**नवी दिल्ली** : संसदेचे पाच दिवसीय विशेष अधिवेशन सोमवार (दि. १८)पासून सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन संसद भवनावर उपराष्ट्रपती जयदीप धनखड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी लोकसभेचे अध्यक्ष ओम प्रकाश बिर्ला हेही उपस्थित होते. संसदेचे विशेष अधिवेशन सुरू होण्याच्या एक दिवस अगोदर विश्वकर्मा जयंतीच्या निमित्ताने नवीन संसद भवनावर तिरंगा फडकवण्यात आला. पहिल्या दिवसाचे अधिवेशन संसदेच्या जुन्या इमारतीतून व उरलेल्या चार दिवसांचे अधिवेशन संसदेच्या नवीन इमारतून होईल. त्यापूर्वी औपचारिकरीत्या नव्या संसदेवर ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्यास संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, व्ही मुरलीधरण यांच्यासह दोन्ही सभागृहातील नेते उपस्थित होते.

## अंतरंग


गेल इंडिया कंपनीविरोधात उसर प्रकल्पग्रस्तांचे उपोषण/२
खोपोलीत नळांना गढूळ पाणी; नागरिकांत संताप/५
राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत 'सीकेटी'ची चमक/८





# महाराष्ट्र-काश्मिरचे नवे मैत्रीपर्व

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दौरा; विविध कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रविवार (दि. १७)पासून दोन दिवसांच्या काश्मीर दौऱ्यावर असून दुपारी साडेतीनच्या सुमारास त्यांचे श्रीनगर येथे आगमन झाले. सरहद संस्थेमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हम सब एक है या कार्यक्रमासह कारगिल आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे उद्घाटन, युद्धस्मारकाला भेट, जवानांशी आणि काश्मीरमधील मराठी कुटुंबीयांशी संवाद आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यानिमित्ताने महाराष्ट्र-काश्मीर मैत्रीच्या नव्या पर्वाला सुरुवात होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रिमंडळ बैठक, मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण आदी कार्यक्रम आटोपून मुख्यमंत्र्यांनी रविवारी दुपारी काश्मिरकडे प्रयाण केले. त्यांच्या समवेत प्रधान सचिव ब्रिजेश सिंह उपस्थित आहेत.



श्रीनगर : रविवारी दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे येथे आगमन झाल्यावर त्यांचे स्वागत करण्यात आले.

पुणे येथील सरहद संस्थेमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त विविधतेतील एकतेला सलाम करणाऱ्या हम सब एक है या विशेष कार्यक्रमासह महाराष्ट्र काश्मीर मैत्रीच्या नव्या पर्वाला सुरुवात म्हणून काश्मिरमधील ७३ ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळ्याचे नियोजन काश्मिरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांचा काश्मीरमधील मराठी बांधवांशी संवाद कार्यक्रम होता. कारगिल येथे सोमवारी सकाळी सहाव्या कारगिल आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर डॉ. अली इराणी तसेच फिजिओथेरपी डॉक्टरांद्वारे कारगिल विजयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित वैद्यकीय शिबिराचे उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. छानीगुंड येथे सरहद संस्थेच्या माध्यमातून भारतीय लष्करासाठीच्या ७२ फुटी तिरंगा झेंड्याचे अनावरणदेखील मुख्यमंत्री करणार आहेत.

मुख्यमंत्री शिंदे हे द्रास येथील युद्ध स्मारकाला भेट देणार असून या वेळी ते लष्कराचे अधिकारी आणि जवानांशी संवाद साधणार आहेत. जनरल वेद प्रकाश मलिक यांच्या कारगिल आश्चर्याचा धक्का ते विजय या मराठी अनुवादित पुस्तकाचे प्रकाशनदेखील मुख्यमंत्री करणार आहेत. या दोन दिवसांच्या या काश्मीर दौऱ्याच्या माध्यमातून महाराष्ट्र-काश्मीर मैत्रीच्या नव्या पर्वाला सुरुवात होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

# गेल इंडिया कंपनीविरोधात उसर प्रकल्पग्रस्तांचे साखळी उपोषण

## आश्वासने पूर्ण न केल्याने आक्रमक पवित्रा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

दिलेली आश्वासने न पाळणाऱ्या गेल इंडिया कंपनी व्यवस्थापनाविरोधात उसर प्रकल्पग्रस्ताच्या संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीने कंपनीच्या गेटसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे.

सहा महिन्यांपूर्वी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मध्यस्तीने प्रकल्पग्रस्त समितीचे होणारे आंदोलन स्थगित झाले होते, मात्र कंपनी व्यवस्थापनाबरोबर ८ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत त्यांनी आजपर्यंत कोणताही पत्रव्यवहार कंपनीने दिल्ली हेड ऑफिसला केला नाही हे निदर्शनास आले. त्यामुळे संतप्त प्रकल्पग्रस्तांनी साखळी उपोषणाचा मार्ग स्वीकारला असून पॉलिमर कंपनीच्या गेटसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे.

गेल इंडिया लि. पेट्रोकॉम्पेक्सच्या उसर येथे नव्याने येत असलेल्या पॉलिमर कंपनी प्रकल्पासाठी नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर, धोटवडे, मल्याण या सहा गावांतील २४७ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. संघटनेच्या वतीने प्रकल्पग्रस्तांच्या न्याय व हक्कांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना साकडे घातले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे उद्योगमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांना या संदर्भात गेल्या वर्षी १४ नोव्हेंबर रोजी निवेदन देत प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची भूमिका मांडली होती. याची दखल घेऊन मंत्री उदय सामंत यांनी प्रकल्पग्रस्तांच्या व गेल इंडिया कंपनी प्रतिनिधी यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक १ मार्च रोजी विधानभवन येथे आयोजित केली होती. त्यामध्ये ६० दिवसांत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार त्यानुसार रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात २७ एप्रिल रोजी कंपनी प्रतिनिधी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत संघटनेची सभा झाली, मात्र कंपनीने आजपर्यंत आश्वासनांची पूर्तता केलेली नाही. अखेर नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर, धोटवडे, मल्याण या सहा गावांतील प्रकल्पग्रस्तांनी संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीच्या वतीने प्रकल्पग्रस्त व स्थानिकांच्या न्याय हक्कांसाठी साखळी उपोषणास सुरुवात केली आहे.




### ... तर काम बंद आंदोलन!

*साखळी उपोषणातून प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष निलेश गायकर, उपाध्यक्ष दत्तात्रेय ठाकूर, कार्याध्यक्ष अनंत शिंदे, जनरल सेक्रेटरी निखिल पाटील, सेक्रेटरी आशिष नाईक, संघटक योगेश गुजर, खजिनदार गिरीष पाटील, सहखजिनदार भरत नाईक, सहसंघटक सचिन मोरे, कामगार प्रतिनिधी प्रमोद धसाडे, वृषिकेश कंटक यांनी कामगारांच्या विविध मागण्या कंपनी व्यवस्थापनासमोर ठेवल्या आहेत. जर कंपनीची मुजोरी अशीच सुरू राहिली, तर ३ ऑक्टोबरपासून काम बंद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कंपनी व प्रशासनाला देण्यात आला आहे.*

# कर्जत येथील नेत्रचिकित्सा शिबिरात ६६ रुग्णांची तपासणी

## १५ रुग्णांवर केली जाणार मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**कर्जत : प्रतिनिधी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुनील गोगटे यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजप तसेच शंकरा आय हॉस्पिटल पनवेल आणि नेरळ येथील हार्मनी फाउंडेशन यांच्या माध्यमातून नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरात ६६ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली तर त्यातील १५ जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.



यातील पाच जणांना ऑपरेशनसाठी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे पाठवण्यात आले, तसेच अनेकांना अत्यल्प दरात चष्मे देण्यात आले. त्याचप्रमाणे सर्वांची मधुमेह आणि रक्तदाब तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुनील गोगटे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, भाजप तालुकाध्यक्ष राजेश भगत, जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, फ्रेंड्स ऑफ बीजेपी जिल्हा संयोजक नितीन कांदळगावकर तसेच नगरसेवक बळवंत घुमरे, मारुती जगताप, महिला तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, माजी नगरसेविका बिनिता घुमरे, प्रीती तिवारी, सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी, वसंत महाडिक, युवा मोर्चा अभिजीत पटेल, सर्वेश गोगटे, युवा मोर्चा अभिषेक तिवारी आदी उपस्थित होते.

# रुग्णसेवा करून महाडमध्ये पंतप्रधानांचा वाढदिवस साजरा

**महाड : प्रतिनिधी**

भारताते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रविवारी (दि. १७) वाढदिवस महाडमध्ये भाजपच्या वतीने रुग्णसेवा व आदिवासी बालकांना खाऊवाटप करून साजरा करण्यात आला, तर आदिवासींमध्ये गणेशमूर्तींचे मोफत वाटप करण्यात आले.

या वेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, चिटणीस निलीमा भोसले, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाड ग्रामिण रुग्णालय रुग्णांना फळे आणि बिस्कीट वाटप करण्यात आले, तसेच शिरगाव आदिवासीवाडी येथे लहान मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. कोहिनूर मित्रमंडळ व भारतीय जनता पक्षाच्या संयुक्त विद्यमाने जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी मोफत गणेशमूर्तींचे वाटप करण्यात आले. या वेळी संकेत पोरे, चंद्रजित पालांडे, मनोज धामनसे, कल्पना विचारे, विश्वतेज भोसले, सुनील सोंडकर, केशव माळी, अनिकेत पवार, आराधना इंगळे, नंदीनी मोरे, साहिल पालांडे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



### करंजाडेतील पाणी प्रश्न मार्गी



**पनवेल : करंजाडे वसाहतीत एमजेपीच्या जलवाहिनीवर बूस्टर पंप लावण्याचे काम सुरू करण्यात आले. आता दिवसातून दोनदा पाणीपुरवठा होईल. या कामाची सरपंच मंगेश शेलार यांनी रविवारी पाहणी केली व या कामासाठी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार महेश बालदी यांचे ग्रामस्थांतर्फे आभार मानले. या वेळी उपसरपंच सागर आंग्रे, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, सदस्य गजानन भोईर, अतिश साबळे, शहराध्यक्ष मिरेंद्र शहारे, नाथाभाई भारवाड यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने सिडकोच्या ताब्यातील भूखंड मिळविण्यात यश

## माजी सभापती अमर पाटील यांचे नागरिकांकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांच्या प्रयत्नाने सिडकोच्या ताब्यात असलेले सेक्टर १९, प्लॉट नंबर २ सी हा भूखंड पनवेल महनगरपालिकेकडे वर्ग करण्यात यश आले. त्यामुळे अमर पाटील यांचे परिसरातील नागरिकांकडून आभार मानले जात आहेत.

सिडकोने विकसित केलेल्या या शहरात सुविधांची वानवा आहे. सेक्टर १७ ते २० या परिसरातील मुलांना खेळण्यासाठी मैदान नसल्याने त्यांच्या गुणांना वाव मिळत नव्हता. मुलांना खेळण्यासाठी मैदान असावे म्हणून अमर पाटील आणि स्वखर्चातून त्याला मैदानाचे स्वरूप आणले होते. हा भूखंड सिडकोच्या ताब्यात असल्याने तो व्यावसायिकाच्या घशात जाऊ नये म्हणून येथील नागरिकांनी अमर पाटील यांना साकडे घातले होते.



त्यांनी पाच वर्षांपूर्वी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा भूखंड खेळाचे मैदान म्हणून महापालिकेच्या ताब्यात असावा म्हणून पत्रव्यवहार सुरू करून सिडको अधिकारी, महानगर पालिका आयुक्त यांच्या सोबत बैठका घेतल्या. यात अमर पाटील यांना आमदार प्रशांत ठाकूर याचे मोलाचे सहकार्य मिळाले. या भूखंडावर अमर पाटील यांना कळंबोलीसाठी सुसज्य असे खेळाचे मैदान बनविण्याचा प्रयत्न असून त्यात त्यांना यश येईल, असा विश्वास आत्मविश्वास येथील नागरिकांनी व्यक्त केला आहे.

सिडकोकडून हा भूखंड पनवेल महानगर पालिकेकडे वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे येथील नागरिकांत आनंदाचे वातावरण असून त्यांच्याकडून पाटील यांचे अभिनंदन केले जाते आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विविध सांस्कृतिक स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १६) सांस्कृतिक समितीतर्फे टॅलेंट हंटच्या माध्यमातून मेहंदी, पेंटिंग, मोनो ॲक्टिंग, सिंगिंग व नृत्य अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते.

मेहंदी स्पर्धेत प्रथम मेहक माहीमकर, द्वितीय मनीषा, उत्तेजनार्थ श्रावणी व फामिया; गीतगायन स्पर्धेमध्ये प्रथम सफिना, द्वितीय अर्सनल, तृतीय क्रमांक खुशी जयस्वाल हिने पटकाविला. एकपात्री अभिनय स्पर्धेमध्ये प्रथम श्रावणी नाकटी हिने पटकाविला. नृत्य स्पर्धेमध्ये प्रथम प्रानदीप भोरा, द्वितीय जोगवा ग्रुप, उत्तेजनार्थ सरस्वती तसेच ग्रुप ट्रबल मेकर यांना देण्यात आला. पेंटिंग स्पर्धेमध्ये सलमान पटेल प्रथम, द्वितीय क्रमांक गौरव गुप्ता याने पटकाविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनीचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धांचे



आयोजन समन्वयक सांस्कृतिक समिती प्रा. डॉ. दीपिका हसिजा यांनी केले, तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. राजश्री मात्रे, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. अंकिता जागिड, प्रा. डॉ. महादेव चव्हाण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून यांनी सहकार्य केले.

पान १ वरुन

# पनवेलमध्ये महापालिकेची इंडियन स्वच्छता लीग २.० रॅली

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, प्रत्येक बाबतीत महापालिका आघाडी घेत आहे. आयुक्तांच्या नेतृत्वाखाली त्यांची सर्व टीम वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करून दाखवत आहे. प्रगतीशील पनवेल बनण्यामध्ये नागरिकांचे सहकार्यही महत्त्वाचे आहे. नागरिकांनी अस्वच्छता करणाऱ्यांना रोखल्यास आपला परिसर स्वच्छ राहील व चांगल्या सवयीतूनच पनवेल शहर अधिक अभिमानाने सर्वांच्या समोर जाईल.

आयुक्त गणेश देशमुख म्हणाले की, शहरातील सर्व नागरिकांच्या श्रमदानामुळे, योगदानामुळे आज पनवेलचा विकास झाला आहे. या स्वच्छता रॅलीचा उद्देश मनपाचे कर्तव्य आणि नागरिकांनी त्यांची जबाबदारी समजून घेणे आहे. हा संदेश समाज घटकातील प्रत्येकापर्यंत पोहचला पाहिजे.

या रॅलीची सांगता ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या वडाळे तलाव येथे झाली. या ठिकाणी सर्व उपस्थितांनी एकत्रितरित्या राष्ट्रगीताचे गायन केले. या रॅलीच्या पार्श्वभूमीवर वडाळे तलावावर सेल्फी पॉईंटची निर्मिती महापालिकेमार्फत करण्यात आली होती. याचासुद्धा आनंद अनेकांनी घेतला.

इंडियन स्वच्छता लीग २.० अंतर्गत समिती ब कळंबोलीमधील रॅली उपायुक्त कैलास गावडे, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे , प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल पाटील उपस्थितीत काढण्यात आली. या रॅलीमध्ये केएलई कॉलेज, सुधागड शाळा, महाराष्ट्र शाळा, बारकुबाई शाळा, दादासाहेब लिमये कॉलेज, सामाजिक संस्था व रोडपाली रहिवासी संघ, नागरिक, वैद्यकीय स्टाफ, स्वच्छता दुत, प्रभाग समिती 'ब'चे कर्मचारी एकूण रॅलीमध्ये एक हजार लोकांचा सहभाग घेऊन रॅलीची उत्साहात सुरुवात करण्यात आली. या रॅलीमध्ये से. १२ म्हसोबा तलाव परिसराची लोकसहभागातून साफसफाई मोहीम घेण्यात आली.

खारघर प्रभागामध्ये इंडियन स्वच्छता लीग २.० अंतर्गत अतिरिक्त आयुक्त भारत राठोड उपायुक्त गणेश शेटे यांच्या उपस्थितीत उत्सव चौक ते ग्रामविकास भवन स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीस तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रॅलीचा शेवट ग्रामविकास भवन येथील बाजारपेठेमध्ये नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करून झाला.

नागरिकांनी महापालिकेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

कामोठे प्रभागात इंडियन स्वच्छता लीग २.० अंतर्गत उपायुक्त अभिषेक पराडकर, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील यांच्या उपस्थितीत शंकर मंदिर तलाव ते लोकनेते दि.बा.पाटील मैदान असे स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत सुषमा पाटील, एमएनआर, लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा, रॉबिनहुड आर्मी, प्रभाग कार्यालयाचे कर्मचारी,स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

या सर्व रॅलीमधील उपस्थितांना महापालिकेमार्फत इंडियन स्वच्छता लीगचा लोगो असणारे टी-शर्ट, टोपी यांचे वाटप करण्यात आले होते. रॅलीमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांच्या हातामध्ये स्वच्छतेचा संदेश देणारे फलक व इंडियन स्वच्छता लीग स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेले विशेष झेंडे यामुळे ही रॅली खूपच खुलून दिसत होती. चारही प्रभागाच्या रॅलीमध्ये उपस्थितांनी स्वच्छतेची शपथ घेतली. या वेळी महापालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वच्छता स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानपत्र तसेच उपस्थितांना प्रमाणपत्र देऊन सर्व प्रभागातील रॅलीची सांगता करण्यात आली. यामध्ये प्रत्येक प्रभागातील स्वच्छ सोसायटी, स्वच्छ शाळा, स्वच्छ हॉटेल, स्वच्छ रुग्णालय यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# पनवेलमध्ये माय इकोफ्रेंडली बाप्पा कार्यशाळा रंगली

गेली दोन वर्षे कोशिश फाउंडेशनच्या माध्यमातून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. लहान मुलांना इकोफ्रेंडली गणपतीचे महत्त्व कळावे तसेच पर्यावरणाचे भान असावे या उद्दिष्टाने कोशिश फाउंडेशनच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी आर्टिस्ट नूतन पाटील व त्यांच्या टीममधील अभिषेक सुनका, निखिल सुनका, रितू यांनी लहान मुलांना गणपती बाप्पाची मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले. बाप्पा साकारल्यानंतर मुले आनंदल्याचे पहावयास मिळाले.




# चाकरमान्यांचे मुरुड तालुक्यात आगमन

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यात मुंबई, ठाणे, बोरिवली, भाईंदर, विरार, पनवेल येथील चाकरमानी मोठ्या संख्येने शहरात दाखल झाले आहेत.

सध्या गणपती कारखान्यात व बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी झाली आहे. आपल्या लाडक्या बाप्पाची आरास सजविण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य, त्याचप्रमाणे पुजेचे साहित्य, फुले, फळांची खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक बाजारपेठेत गर्दी करीत आहेत. गणपती आगमनाच्या दिवशी खालू बाजा, बँजोच्या तालावर नाचत भक्तीभावाने वाजत गाजत गणेशाची मूर्ती आणली जाते.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ६३
www.ramprahar.com
सोमवार, १८ सप्टेंबर २०२३◆ पाने ८ ◆किंमत ₹ २


## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त नमो ११ सूत्री कार्यक्रमाची घोषणा

**छत्रपती संभाजीनगर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्य सरकार ११ सूत्री कार्यक्रम राबवणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. १७) पत्रकार परिषदेत दिली. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरात आले असता ते माध्यमांशी बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवारही उपस्थित होते. यामध्ये नमो महिलांना शासकीय योजनेचा लाभ, नमो कामगार कल्याण अभियान, नमो शेततळी अभियान, नमो आत्मनिर्भर आणि सौर ऊर्जा गाव अभियान, नमो ग्राम सचिवालय अभियान, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, नमो दिव्यांग शक्ती अभियान, नमो क्रीडा मैदान व उद्यान अभियान, नमो शहर सौंदर्यीकरण अभियान, नमो तीर्थस्थळे व गडकिल्ले संरक्षण कार्यक्रम आणि नमो गरीब व मागासवर्गीय सन्मान अभियान यांचा समावेश आहे. यासाठी यासाठी लागेल तितका निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. नमो ११ सूत्री कार्यक्रमातील कामांचा दर महिन्याला आढावा घेण्यात येईल. यामुळे वर्षभरात ही सर्व कामे पूर्ण होतील, असा विश्वासही या वेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा शुभारंभ

## ■ ३० लाख कुटुंबांना होणार फायदा –नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला ७३वा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करीत पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा शुभारंभ रविवारी (दि. १७) केला. दिल्लीतील द्वारका येथील इंडिया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन अ‍ॅण्ड एक्स्पो सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी या योजनेचे लोकार्पण करताना ही योजना आशेचा नवा किरण असून यामुळे देशातील ३० लाख कुटुंबांना थेट फायदा होणार असल्याचे म्हटले. या वेळी पंतप्रधानांनी विविध कलाकार आणि कारागिरांना पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र दिले.

पीएम विश्वकर्मा योजना सुमारे १३ हजार कोटी रुपयांची आहे, ज्यामध्ये कारागिरांना आर्थिक मदतीसाठी कर्ज दिले जाणार आहे. कर्जाच्या पहिल्या हप्त्यात एक लाख रुपये आणि दुसऱ्या हप्त्यात दोन लाख रुपये मिळतील. या कर्जावर पाच टक्के सवलतीच्या दराने व्याज आकारले जाईल.

देशातील नागरिकांचे कौशल्य वाढवण्यासाठी या माध्यमातून प्रशिक्षणही दिले जाणार आहे. योजनेचे लाभार्थी पीएम विश्वकर्मा पोर्टलशी जोडले जातील. कारागिरांची मोफत नोंदणी करण्यात येणार आहे. अर्ज करणाऱ्या नागरिकांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे इतकी आवश्यक असणार आहे. या योजनेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष लाभ कोट्यवधी लोकांना होईल.

सरकारने या योजनेत १८ पारंपारिक कौशल्य व्यवसायांचा समावेश केला आहे, ज्यामुळे संपूर्ण भारतातील ग्रामीण आणि शहरी भागातील कारागीरांना मदत होईल. यात सुतार, होडी बनवणारे, लोहार, कुलूप बनवणारे, सोनार, मातीची भांडी आणि इतर वस्तू बनवणारे कुंभार, शिल्पकार, गवंडी, माशांचे जाळे बनवणारे, खेळणी बनवणारे व इतरांचा समावेश आहेत.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या लोकांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज भगवान विश्वकर्मा यांची जयंती आहे. हा दिवस आपल्या पारंपरिक कारागिरांना आणि शिल्पकारांना समर्पित आहे. मी सर्व देशवासीयांना विश्वकर्मा जयंतीच्या शुभेच्छा देतो.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, भगवान विश्वकर्मा यांच्या आशीर्वादाने आजपासून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू करण्यात आली आहे. पंतप्रधान विश्वकर्मा योजना हाताची कौशल्य आणि साधने घेऊन काम करणाऱ्या लाखो कुटुंबांसाठी आशेचा नवा किरण म्हणून येत आहे. या योजनेचा लाभ घ्या.

### स्थानिक उत्पादने खरेदीचे आवाहन

विश्वकर्मा दिनी आपण स्थानिकांच्या उत्पादनांना प्राधान्य देण्याच्या आपल्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला पाहिजे. आता गणेश चतुर्थी, धनत्रयोदशी, दिवाळीसह अनेक सण-उत्सव येत आहेत. मी सर्व देशवासीयांना स्थानिक खरेदी करण्याचे आवाहन करेन, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी या वेळी म्हणाले. व्होकल फॉर लोकलच्या माध्यमातून लोकांना स्थानिक विक्रेत्यांकडून आवश्यक वस्तू खरेदी करण्याची विनंती केली जाते.



# पनवेलमध्ये महापालिकेची इंडियन स्वच्छता लीग २.० रॅली

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह नागरिकांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे स्वच्छ भारत अभियानाची पनवेल महापालिका हद्दीत प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. महापालिकेमार्फत प्रगतीशील पनवेल टीम ही इंडियन स्वच्छता लीग २.० या स्पर्धेत सहभागी आहे. यात महापालिका कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी जनजागृती करण्याच्या दृष्टीने रविवारी (दि. १७) सकाळी खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेलमध्ये या चारही प्रभागांमध्ये स्वच्छता रॅलीचे आयोजन महापालिकेच्या वतीने करण्यात आले होते. या रॅलीला दहा हजारहून अधिक तरुण, नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून सहभाग घेतला.

पनवेलमध्ये महापालिका मुख्यालय ते वडाळे तलाव या मार्गावर ही रॅली काढण्यात आली. या वेळी आयुक्त गणेश देशमुख, प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोषचे वडील संदीप घोष, उपायुक्त सचिन पवार, डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, लेखा परिक्षक निलेश नलावडे, स्वच्छता विभागप्रमुख अनिल कोकरे, माजी नगराध्यक्ष हमीदसईद मुल्ला, रनथॉन सायकलिंग क्लबचे सदस्य, सीकेटी महाविद्यालय, याकुब बेग, छोटा खांदा, काळसेकर महाविद्यालय, बांठिया शाळा, सीकेटी इंग्लिश मीडियम शाळेचे विद्यार्थी, गुड मॉर्निंग रंग क्लबचे सदस्य उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# माणगावजवळ एसटी बस-कंटेनरची धडक

## एक ठार, ३४ प्रवासी जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**



(छाया : सलीम शेख)

मुंबई-गोवा महामार्गावर माणगावजवळील रेपोली गावाच्या हद्दीत एसटी बस आणि कंटेनरवर यांच्या अपघातात बसमधील एका प्रवाशाचा मृत्यू झाला असून दोन प्रवासी गंभीर, तर ३२ प्रवासी किरकोळ जखमी झाले. हा अपघात रविवारी (दि. १७) पहाटे ४.२०च्या सुमारास झाला.

या अपघातातील कंटेनर (एमएच ४६-बीबी ५९४८)चा चालक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मुंबई-गोवा महामार्गावर जड, अवजड वाहनांना बंदी असतानाही या आदेशाचे उल्लंघन करून आपल्या ताब्यातील वाहन मुंबई बाजूकडून महाड बाजूकडे घेऊन जात होता. त्याने कंटेनर रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून अचानक उजव्या लेनवरून डाव्या बाजूच्या लेनवर घेतला. त्यामुळे पाठीमागून येणारी एसटी बस (एमएच १४-बीटी २६६४) या कंटेनरवर धडकून अपघात झाला. अपघातानंतर कंटेनरचालक पळून गेला.

या अपघातात बसमधील प्रवासी विनोद पांडुरंग तारले (वय ३८, रा. डोंबिवली, मूळ रा. राजापूर जि. रत्नागिरी) यांचा मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी वैष्णवी विनोद तारले (वय ३६) आणि मुलगा अथर्व विनोद तारले (वय १५) गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून कामोठे एमजीएम हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले. अन्य ३२ किरकोळ जखमी प्रवाशांवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले, तर या अपघाताची नोंद गोरेगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून फरारी कंटेनरचालकाचा शोध सुरू आहे.

# भारत आठव्यांदा आशियाई चॅम्पियन

**कोलंबो : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताने अंतिम फेरीत श्रीलंकेचा १० गडी राखून पराभव करीत विजेतेपद पटकावले. श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र भारतीय गोलंदाजांसमोर श्रीलंकेचा डाव ५० धावांवर आटोपला. त्यानंतर भारताने ६.१ षटकांत १० विकेट्स राखून सामना जिंकला. श्रीलंकेचे सहा गडी बाद करून त्यांच्या डावाला सुरुंग लावणारा मोहम्मद सिराज भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला.

श्रीलंकेचा धुव्वा



यासह भारताने आठव्यांदा आशिया चषक आपल्या नावे केला. भारताने सात वेळा, तर श्रीलंकेने सहा वेळा हे विजेतेपद पटकावले होते. गेल्या वेळी भारताने २०१८मध्ये आशिया चषक जिंकला होता आणि आता पाच वर्षांनंतर आठव्यांदा रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली आशिया चषकावर नाव कोरले आहे.



**पनवेल : साईनाथ सुरेश काळे यांची एमपीएससीमधून मंत्रालयात महसूल सहाय्यक या पदावर निवड झाली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी साईनाथ काळे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक अजय कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, युवा मोर्चा सरचिटणीस गौरव कांडपिळे उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)

# पनवेलमध्ये माय इकोफ्रेंडली बाप्पा कार्यशाळा रंगली

## कोशिश फाउंडेशनच्या स्तुत्य उपक्रमास बचेकंपनीचा प्रतिसाद



(छाया : प्रफुल्ल कांबळे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त कोशिश फाउंडेशनच्या वतीने पनवेल प्रभाग क्रमांक १९करिता माय इकोफ्रेंडली बाप्पा कार्यशाळा रविवारी (दि. १७) आयोजित करण्यात आली होती. शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील श्री गणेश मंदिर सभागृहात झालेल्या या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी ६० ते ७० मुलांनी सहभाग नोंदवत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या.

चला आपला बाप्पा स्वतः साकारूया, पर्यावरणाचा समतोल राखूया या संकल्पनेतून कोशिश फाउंडेशनच्या वतीने अध्यक्ष तथा महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत मिडलक्लास हाऊसिंग सोसायटी श्री गणपती मंदिर येथे माय इकोफ्रेंडली बाप्पा कार्यशाळा रंगली.

या कार्यशाळेस माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजारराव, उपाध्यक्ष संदीप पाटील, अमरीश मोकल, भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चाचे चिन्मय समेळ, पवन सोनी आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा





## संपादकीय

# मराठवाड्याला बूस्टर

**सातत्याने दुष्काळाच्या छायेत असलेल्या मराठवाड्याला राज्यातील महायुती सरकारने विकासाचे भरभरून दान दिले आहे. राज्य मंत्रिमंडळाची बैठक शनिवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये झाली. या वेळी मराठवाड्याचा कायापालट घडविणारा तब्बल ४६ हजार ५७९ कोटी ३४ लाख रुपयांचा संकल्प जाहीर करण्यात आला. याशिवाय नदीजोड प्रकल्पासाठी १४ हजार कोटींच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. अशा प्रकारे ५९ हजार कोटींचे पॅकेज देण्यात आले आहे.**

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाची बैठक सुमारे सात वर्षांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित होते. तत्पूर्वी स्मार्ट सिटी कार्यालयात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच छत्रपती संभाजीनगर महसुली विभाग आणि धाराशिव जिल्हा, तालुका, गाव या नामकरण फलकांचे अनावरण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते झाले. या वेळी दिलेल्या छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय या जयघोषामुळे परिसर दुमदुमून गेला होता. महाविकास आघाडीच्या काळात मराठवाड्यात रखडलेला विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, नियोजन, ग्रामविकास, कृषी तसेच पशूसंर्वधन आदी विभागांशी निगडीत विविध निर्णय घेण्यात आले. या वेळी पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, आम्ही जे निर्णय घेतले ते मराठवाड्याच्या विकासासाठी, मराठवाड्यातील लोकांना न्याय देण्यासाठी घेतले आहेत. जे प्रकल्प प्रलंबित आहेत ते आम्ही मार्गी लावत आहोत. समृद्धी महामार्ग मराठवाड्याला लागून जातो. त्याचा फायदा होईल. औद्योगिक इंडस्ट्री वाढते आहे. त्याचाही फायदा मराठवाड्याला होणार आहे, असे म्हटले, तर मराठवाड्यात शेवटची मंत्रिमंडळ बैठक ४ ऑक्टोबर २०१६मध्ये झाली होती. त्या बैठकीत ३१ निर्णय घेण्यात आले होते. यापैकी २२ विषय अवगत करण्यात आले होते, तर काही विषयांवर निर्देश झाले होते. या ३१ विषयांचा आढावा २०१७ साली आपण घेतला तेव्हा १० विषयांवरील कार्यवाही पूर्ण झाली होती. उरलेल्या १५ विषयांवर कार्यवाही टप्प्यात होती, तर सहा विषयांवरील कार्यवाही अपूर्ण होती. आज २०२३चा आपण विचार केल्यास या ३१ विषयांपैकी २३ विषय पूर्ण झाले आहेत, सात विषय प्रगतिपथावर आहेत, तर एक विषय उद्धव ठाकरेंच्या काळात व्यपगत झाला, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मराठवाडा प्रशासकीय विभागात छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, नांदेड, परभणी, बीड, लातूर आणि हिंगोली अशा आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. या आठही जिल्ह्यांसाठी आवश्यक ती तरतूद करण्यात आली आहे, जेणेकरून हे जिल्हे आणि संपूर्ण विभाग विकासाच्या प्रवाहात येईल. विशेषकरून जलसिंचन प्रकल्प, नदीजोड प्रकल्प याद्वारे अवर्षणग्रस्त मराठवाड्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. मागील ठाकरे सरकार घरी बसून काम करीत होते. याउलट आताचे महायुती सरकार प्रत्यक्ष जागेवर जाऊन ठोस निर्णय घेत असून यातून जनतेला दिलासा मिळत आहे. नैसर्गिक प्रतिकूलता असलेल्या मराठवाड्यात विविध सोयीसुविधा पुरवून तेथील नागरिकांचे जीवन सुकर करण्याचा संकल्प विद्यमान सरकारने केला आहे. त्याकरिता या सरकारने निश्चितपणे अभिनंदन केले पाहिजे.

# कर्जतमधील वाहतूक कोंडी ठरतेय डोकेदुखी!

**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत शहरात वाहतूक कोंडी होण्याचे कारण म्हणजे कुठेही उभ्या करण्यात येणाऱ्या रिक्षा आणि बाजारपेठेतील दुतर्फा असलेले हातगाडीवाले आणि फेरीवाले. या सर्वांमुळे कर्जतच्या बाजारपेठेतच नव्हे तर शहरातून चालणे कठीण होत आहे. त्यांच्यावर कुणाचाच वचक नाही असा सूर कर्जतकरांकडून ऐकायला मिळतो, परंतु अनेकजण याबाबतीत पाठपुरावा करतात, मात्र त्याला यश येत नाही. दिवसेंदिवस शहरातील वाहतूक कोंडी डोकेदुखी ठरत आहे. आता तर गणपतीचा उत्सव आला आहे. त्यामुळे खरेदीसाठी दोन्ही बाजारपेठांमध्ये खूप गर्दी होत आहे. त्याचे कारण संबंधित अधिकाऱ्यांची मानसिकता.



कर्जत ग्रामपंचायत असताना रस्ते फार लहान होते. ते रुंदीकरण करण्याचे काम माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे यांनी हाती घेतले होते. त्या वेळी त्यांना खूप विरोध झाला होता. त्याला न जुमानता रस्ते थोडेसे रुंद झाले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही, कारण हे रस्ते त्या वेळीदेखील म्हणजे ३५-४० वर्षांपूर्वी हातगाडीवाल्यांनी काबीज केले होते. त्यानंतर कर्जत ग्रुप ग्रामपंचायत आणि दहिवली ग्रामपंचायतीची एकत्रित कर्जत नगर परिषद जाहीर झाली. ही घटना १९९२ सालची. त्यानंतर १९९४ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सत्ता आली. पुढे १९९९ साली काँग्रेसमध्ये फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती करण्यात आली. त्या वेळी झालेल्या निवडणुकीत सुरेश लाड आमदार झाले. त्या वेळी रस्ते मोठे होऊनही त्याचा काही उपयोग झाला नाही. बाजारपेठेतील रस्त्यांच्या दुतर्फा हातगाडी व फेरीवाल्यांनी ठाण मांडले. खरेतर नगर परिषद परवाना असलेल्या हातगाड्या किती? आणि प्रत्यक्षात हातगाड्या किती? हा म्हणजे संशोधनाचा विषय आहे. त्यांच्यावर ठोस कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. कुणीतरी विरोध केला की तात्पुरती मलमपट्टी करण्याचे प्रकार होत असतात, मात्र काही दिवसांनी जैसे थे परिस्थिती होते.

कपालेश्वर मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळादरम्यानच्या रस्त्यावर नो हॉकर्स झोन करण्याचे ठरले होते. त्यानंतर त्या रस्त्यावर हातगाडीला बंदी घालण्यात आली होती. हा ठराव करताना त्यावेळी जे नगरसेवक होते. त्यातील दोन-तीन नगरसेवक आतासुद्धा नगर परिषदेत आहेत, मात्र याबाबत ते काहीही करू शकत नाहीत. मध्यंतरी या रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कारवाई करून त्यांना उठवण्यात आले होते, मात्र मतांच्या राजकारणासाठी त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप झाला आणि ही कारवाई औटघटकेची ठरली. आता तर त्या रस्त्यावरून चालणेही कठीण होऊन बसले आहे.

फेरीवाले, हातगाडीवाले रस्त्यावर बसतात त्यात भर म्हणून शासनाने रिक्षा परवाने खुले केले. त्यामुळे अनेक बेरोजगार युवक रिक्षा व्यवसायात पडले. रस्ते तेच मात्र वाहनांची संख्या दुप्पट, तिप्पट झाल्याने त्यांचे नियोजन करता करता पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज कसरत होते. कर्जत शहरात कोणत्याही चौकात मोकळी जागा नाही. सर्वच ठिकाणी रिक्षावाले अगदी बिनदिक्कतपणे रिक्षा उभ्या करतात. एक आहे ज्या वेळी आरटीओचा कॅम्प असतो तेव्हा यातील काही रिक्षा आडबाजूला लावल्या जातात. याकडेही दुर्लक्ष केले जाते. काही महिन्यांपूर्वी टोविंग व्हॅन उपलब्ध होती, मात्र पोलीस प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन याची जबाबदारी घेत नसल्याने ती बंद आहे. पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारीही कमी आहेत. त्यामुळे त्याचाही नाईलाज आहे. टोविंग व्हॅन सुरू असताना चांगली शिस्त लागली होती. वाहतूक कोंडीची समस्याही बऱ्यापैकी सुटली होती, मात्र आता सारे पुन्हा सुरू झाले आहे.

हातगाडी व फेरीवाले यांच्यासाठी एक वेगळेच ठिकाण ठरवून त्यांची व्यवस्था करायला हवी. कोरोनाच्या काळात या सर्वांना पोलीस मैदानात व्यवस्था करून दिली होती. त्यावेळी सर्वांना सोयीस्कर झाले होते. त्या वेळी दिवसाही बाजारातील रस्ता खूप मोठा आहे. हे पहायला मिळत होता. दुसरा उपाय म्हणजे चारचाकी गाड्या बाजारपेठेत येऊ न देणे. ठरवलेले एक दिशा मार्ग अमलात आणणे. तरच शहरातील वाहतुकीची समस्या सुटू शकेल.

# माणसं चितारणारा लेखक व्यंकटेश माडगूळकर

सांगली जिल्ह्यातील माणदेश परिसर पर्जन्यछायेखाली येतो. त्यामुळे त्याचे वर्णन वाळवंटी, निष्पर्ण, उजाड असेच करता यईल. पश्चिम महाराष्ट्र एकीकडे कृष्णा, कोयना, पंचगंगा या नद्यांमुळे हिरवागार बनलेला असताना माणदेश परिसर मात्र दुष्काळाच्या झळा सहन करतो आहे.

या वाळवंटी रूक्ष भागाने संपूर्ण महाराष्ट्राला साहित्यरूपी ओलावा पुरविणारे खळाळते निर्झर दिले. ग. दि. माडगूळकर व त्यांचे बंधू व्यंकटेश माडगूळकर. कथा, कादंबरी, पटकथा लेखन, गीतलेखन हे क्षेत्र त्यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही.

गदिमा या मोठ्या वृक्षाखाली व्यंकटेश माडगूळकरांचे रोपटे खुरटले नाही, तर स्वतंत्रपणे जोरदार वाढले. कथा व कादंबरीकार ही प्रामुख्याने त्यांची ओळख. यासोबतच त्यांनी ललित लेखनसुद्धा केले. अनेक चित्रपटांच्या पटकथा लिहिल्या.

माणदेशचा परिसर हा वरवरून रूक्ष वाटत असला तरी येथील माणसांमध्ये सांस्कृतिक वैविध्य आहे. इथल्या माणसाचे जगणे त्यांनी शब्दात मांडले. जे दिसलं तसं मांडले त्यामुळे त्यात एक सच्चेपणा आहे. त्यांचे माणदेशी माणसे हे पुस्तक आले आणि साहित्य जगाला त्याची दखल घ्यावी लागली.



सर्वसामान्यपणे बहुजन समाजातील व्यक्तींचे चित्रण मांडणारे हे पुस्तक अंतर्मुख करणारे आहे. यातील देवा सटवा महार ही कथा तर दलित साहित्यातील पहिली कथा असल्याचे गो. मा. पवार यांच्यासारख्या समीक्षकांचे मत आहे. त्यांच्या व्यक्तिचित्रात माणदेशही जिवंत होतो. येथील माणूस रांगडा व ताठर दिसत असला तरी त्याच्या अंतःकरणातून ओलावा पाझरत असतो. याचेच वर्णन माडगूळकरांच्या बनगरवाडी या कादंबरीतून येते. बनगरवाडी ही कादंबरी ओघवती लेखन शैली व प्रत्ययकारी चित्रण यामुळे उत्कृष्ट साहित्यिक कलाकृती ठरली आहे.

बनगरवाडीसोबतच माडगूळकरांच्या अनेक साहित्यिक कलाकृतींचे जागतिक भाषांमध्ये भाषांतरे झाली. जंगल सफारीचा त्यांचा छंद सर्वपरिचित आहे. जंगलांच्या सफरी व नैसर्गिक वन्य व प्राणी संपदेची वर्णने त्यांच्या नागझिरा, हिरवी वने, व रानमेवा या ललित लेखनांत आली आहेत.

माडगूळकर यांचे लेखन कॅनव्हासवर चित्र रेखाटल्याप्रमाणे सहज, सुंदर व ओघवते असते. त्यांच्या लेखनात दृष्य परिणाम असतो. याचे कारण ते लेखकासोबतच उत्कृष्ट चित्रकारही होते. बनगरवाडी या कादंबरीवर प्रख्यात दिग्दर्शक अमोल पालेकर यांनी बनगरवाडी नावाचा चित्रपटही बनविला आहे. साहित्यात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना साहित्य अकादमीच्या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

**(साभार : मराठी वेबदुनिया)**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवर आता जाहिराती दिसणार? जाणून घ्या सविस्तर




सध्या आपण जे व्हॉट्सॲप वापरतो, ते पूर्णपणे मोफत आहे. पण बरेचदा बातम्या येतात की व्हॉट्सॲप वापरण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील. नुकतीच पुन्हा एक अशी बातमी आली आहे की आता व्हॉट्सॲपवर जाहिराती दिसणार आहेत. असा दावा केला जात आहे की मेटा प्लॅटफॉर्म आपली कमाई वाढवण्यासाठी व्हॉट्सॲपवर जाहिराती दाखवण्याचा विचार करत आहे. 'जाहिरातमुक्त व्हॉट्सॲप' चालवण्यासाठी तुम्हाला शुल्क भरावे लागेल. म्हणजे एक प्रकारे व्हॉट्सॲप वापरण्याचे पैसे घेतले जातील. या दाव्यांमध्ये कितपत तथ्य आहे, ते जाणून घेऊया.

**व्हॉट्सॲप खरंच झरळव होणार का?**

व्हॉट्सॲप वापरण्याचे पैसे घेतले जाणार या वृत्ताचे त्यांनी याआधी खंडन केले होते, पण आता व्हॉट्सॲपने या प्रकरणी स्पष्टीकरण दिले आहे. स्पष्टीकरणातील माहितीनुसार, व्हॉट्सॲप पेड करण्याची कोणतीही योजना आहे. कंपनी सध्या ॲप-मधील जाहिराती (In-App Ads) दाखवण्याचा अजिबात विचार करत नाही. या आधीही व्हॉट्सॲप पेड करण्याचा मुद्दा अनेक वेळा उपस्थित केला गेला आहे. भारत आणि ब्राझीलमध्ये व्हॉट्सॲप वापरकर्त्यांची संख्या खूप जास्त आहे. त्यामुळे मधूनमधून अशा अफवा येत असतात.

व्हॉट्सॲपच्या लंडन युनिटचे प्रॉडक्ट डायरेक्टर ॲलिस न्यूटन-रेक्स यांचे म्हणणे आहे की, अनेक वर्षांपासून लोक व्हॉट्सॲपवर व्यवसायांशी जोडण्याचा प्रयत्न करत आहेत. अहवालानुसार, भारत आणि ब्राझीलसारख्या देशांमध्ये व्हॉट्सॲपचा वापर दैनंदिन काम आणि व्यवसायासाठी केला जातो. उदाहरणार्थ, ट्रेन आणि बसची तिकिटे बुक करण्यापासून ते ऑनलाइन उत्पादने ऑर्डर करण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीत व्हॉट्सॲपची मदत घेतली जाते. अशा परिस्थितीत, व्हॉट्सॲपवर जितके जास्त संभाषण होतील तितका जास्त महसूल मिळवता येईल. या मॉडेलमधून पैसे कमावल्याच्या अनेक बातम्या आल्या आहेत, पण व्हॉट्सॲपने मात्र हे वृत्त पूर्णपणे फेटाळून लावले आहे.

# हरतालिका विशेष : अखंड सौभाग्यप्राप्तीचे व्रत

**निमित्त**



अखंड सौभाग्य रहावे यासाठी हरतालिकेचे व्रत केले जाते. भाद्रपद महिन्यात शुक्ल पक्षाच्या तृतीयेस हे व्रत करण्यात येते. 'हर' हे भगवान शंकराचेच नाव आहे. शंकराची आराधना करण्यात येत असल्याने या व्रतास हरतालिका म्हणून संबोधण्यात येते. 'हरी' हे भगवान विष्णूचे नाव आहे. हरतालिकेसंबंधी पौराणिक कथाही आहेत. पार्वतीने एकदा आपल्या सख्यांना सोबत घेऊन हे व्रत केले होते. कालांतराने हे हरतालिका व्रत म्हणून प्रसिद्ध झाले. या व्रतासाठी हरतालिका किवा हरितालिका दोन्ही शब्दांचा उपयोग करण्यात येतो. ग्रंथामध्येही दोन्ही शब्द आढळतात.

हरतालिका व्रत सर्व पाप व कौटुंबिक चिंतांना दूर करणारे आहे. शास्त्रात या व्रताबाबत 'हरित पापान सांसारिकान क्लेशाश्च', अर्थात हे व्रत सर्वप्रकारचे दु:ख, कलह, व पापांपासून मुक्ती देते, असे म्हटले आहे. शिव-पार्वतीच्या आराधनेचे हे सौभाग्य व्रत फक्त महिलांसाठी आहे. निर्जला एकादशीप्रमाणेच हरतालिका व्रताच्या दिवशीही उपवास पाळण्यात येतो. पार्वतीने भगवान शंकराशी लग्न करण्यासाठी हे व्रत केले होते. पार्वतीच्या इच्छेची पूर्तीही याच दिवशी झाली होती.

पतीप्रती आपली भक्ती व इच्छित पती मिळावा यासाठी या व्रताचे पालन करण्यात येते. इच्छेनुसार पती मिळावा यासाठी मुलीही या व्रताचे पालन करतात. व्रतात आठ प्रहर उपवास केल्यानंतर अन्नसेवन करण्यात येते. व्रतापासून मिळणार्या फळाचे वर्णन 'अवैधव्यकारा स्त्रीणा पुत्र-पौत्र प्रर्वधिनी' असे करण्यात आले आहे. अर्थात जीवनात सुख लाभण्यासाठी व्रताचे विधिपूर्वक पालन करण्यास सांगण्यात आले आहे.


भविष्योत्तर पुराणानुसार हरतालिका व्रताच्या दिवशी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या तृतीयेस 'हस्तगौरी, 'हरिकाली व 'कोटेश्वरी' व्रताचेही पालन करण्यात येते. दुसर्या शब्दात सांगायचे झाल्यास हरतालिका व्रत या नावानेही प्रसिद्ध आहे. यामध्ये आदी शक्तीमाता पार्वतीचे गौरीच्या रूपात पूजन करण्यात येते. भाद्रपद शुक्ल पक्ष तृतीयेच्या दिवशीच हस्तगौरी व्रताचे अनुष्ठान होते.

महाभारत काळातही हे व्रत पाळण्यात येत होते, याचा संदर्भ आढळतो. भगवान श्रीकृष्णाने राज्यप्राप्तीसाठी, धन-धान्याच्या समृद्धीसाठी कुंतीस या व्रताचे पालन करण्यास सांगितले होते. यामध्ये तेरा वर्षांपर्यंत शिव-पार्वती व श्रीगणेशाचे ध्यान करण्यात येते. चौदाव्या वर्षी व्रताचे उद्यापन करण्यात येते.

**(साभार : वेबदुनिया मराठी)**

**क्लिक...क्लिक...!**





**तळकोकण : 'माटी' हे कोकणातील नैसर्गिक समृद्धतेचे व सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक आहे. श्री गणपतीच्या आसनाच्या वर माटी बांधण्यात येते. यामध्ये वेगवेगळ्या वनस्पतींची फळे, पाने, फुले बांधली जातात. हे बांधण्यासाठी लाकडाची माटी वापरली जाते. त्यासाठी तळकोकणातील दोडामार्ग येथील गणपती येण्यापूर्वी आठवडा बाजार सजला आहे.**
(छाया : राधाकृष्ण म्हापसेकर)

## आरोग्य प्रहर

# आरोग्य प्रदान करणारी मुगाची डाळ, वाचा फायदे

जेवणाच्या ताटातली मुगाच्या डाळीच्या आमटीची वाटी म्हणजे पोषणाचा खजिना.. आरोग्य राखायचं तर जेवणात मुगाच्या डाळीचे पदार्थ हवेच. दिसते साधी-शिजते पटकन मुगाच्या डाळीत भरपूर पोषण मिळते.



वजन कमी करण्यासाठी मुगाची डाळ फायदेशीर असते. पचन क्रिया व्यवस्थित ठेवण्यासाठी, सुधारण्यासाठी आहारात मुगाच्या डाळीला महत्व आहे. पोटातील उष्णता कमी होण्यासाठी मुगाची डाळ खावी. आरोग्यासाठी जेवणात डाळ, डाळींचे पदार्थ खाण्याला महत्व आहे. सर्वच डाळी आरोग्यासाठी पोषक असतात पण उन्हाळ्यात मुगाची डाळ खाण्याला विशेष महत्व आहे. मुगाच्या डाळीत कॉपर, फोलेट, रायबोफ्लेविन, क, बी ६ जीवनसत्व, फायबर, पोटॅशियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम, लोह, नियासिन, थायमिन हे घटक असतात. मूग डाळीत असलेल्या फायबरमुळे आतड्यातील घाण बाहेर टाकण्यास मदत होते. मुगाची डाळ खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. केवळ वरण आमटीच्या स्वरुपातच नव्हे तर मुगाची डाळ कचोरी, मोड आलेलेली उसळ, शिरा, खिचडी, सूप या चविष्ट आणि पौष्टिक स्वरुपात खाता येते.

मूग डाळ खाल्ल्याने वजन कमी होण्यापासून रक्तदाब नियंत्रित ठेवण्यापर्यंत आरोग्यास विविध फायदे होतात. वजन कमी करण्याचे प्रयत्न सुरु असतील तर मुगाची डाळ आहारात अवश्य असावी. मुगाच्या डाळीत कॅलरीज (उष्मांक) कमी असतात. त्यामुळे मुगाची डाळ खाल्ल्यानं वजन नियंत्रित राहातं. वजन कमी करण्यासाठी मुगाची डाळ वरण, सूप, मोड आलेले अख्ख्या मुगाची उसळ आणि पौष्टिक खिचडीच्या स्वरुपात खाता येते. मुगाच्या डाळीत असलेले लोह, पोटॅशियम, कॅल्शियम, ब जीवनसत्व, प्रथिनं हे पोषक घटक शरीरातील अशक्तपणा दूर करुन ऊर्जा निर्माण करतात.

दिवसभर शरीरात ऊर्जा टिकून राहावी यासाठी मुगाची डाळ खाण्याला महत्व आहे. शरीरातील कोलेस्ट्रॉल वाढल्यावर मुगाची डाळ खाणं फायदेशीर ठरतं. मुगाच्या डाळीमुळे शरीरात जास्त झालेलं कोलेस्ट्रॉलचं प्रमाण नियंत्रणात येतं. पचनासाठी मुगाची डाळ सर्वात उत्तम मानली जाते.

# खोपोलीत नळांना गढूळ पाणी; नागरिकांत संताप

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेकडून रविवारी (दि. १७) सकाळी अत्यंत गढूळ व अशुद्ध पाण्याचे वितरण झाल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. नगरपालिका पाणीपुरवठा विभाग असे अस्वच्छ पाणी वितरित करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठाबाबत खोपोली नगरपालिका ओळखली जाते, मात्र रविवारी सकाळी वितरित झालेले पाणी बघून नागरिकांना धक्का बसला. अत्यंत गढूळ, आरोग्यासाठी हानिकारक पाणी पुरवठा झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. याबाबत खोपोली पालिका जलशुद्धीकरण केंद्र अधिकारी व पालिका पाणी पुरवठा अधिकाऱ्यांना विचारले असता, शनिवारी रात्री मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने पाताळगंगा नदीला पूर आला होता. हेच पाणी पाताळगंगा नदीवरील पंपिग स्टेशनद्वारे काजूवाडी जलशुद्धीकरण केंद्रात आले. त्याचा परिणाम रविवारी सकाळी वितरित झालेले पाणी काही प्रमाणात गढूळ असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान जलशुद्धीकरण केंद्रावरील वास्तव्य वेगळे



असल्याचे अधिक माहिती घेतल्यावर समजले.

रविवारी पहाटे पाणी वितरणापूर्वी नियमित केला जाणारा बँकव्हाशमध्ये त्रुटी राहिल्याने व पाण्यातील गाळ वेगळा करण्यासाठी त्रुटीची डोजिंग मात्रा कमी झाल्याने रविवारी शहरात गढूळ पाणी वितरित झाले असे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भात मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्याशी संपर्क होऊ न शकल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळाली नाही.

## गणपती प्रतिष्ठापनेसाठी गुरुजींना मागणी कायम

**खोपोली : प्रतिनिधी**

लाडक्या गणरायाचे यथोचित स्वागत आणि आध्यात्मिक शास्त्रानुसार प्रतिष्ठापनेसाठी गुरूजींना निमंत्रित करण्यांची संख्या या वर्षीही वाढली आहे. ऑनलाईन पुजेच्या अनेक वेबसाईट; एवढेच नव्हे तर मोबाईलवर ॲप्लिकेशन उपलब्ध असतानाही, भक्त गुरूजींकडून गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून घेत असल्यामुळे दिवसभराच्या अपॉइंटमेंट फुल झाल्या आहेत, असे मत नडोदे येथील जंगम यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.



गणपती वर्षातून एकदाच येतो, त्याची आराधना मनापासून झाली पाहिजे, अशी गणेशभक्तांची मनोकामना असते. आज विज्ञान युगात मोबाईलमध्ये विविध ॲप्लिकेशन अथवा ऑनलाईन पुजेच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण होत नाही. यामुळे गुरूजी घरी आल्यास पूजा झाल्याचे समाधान मिळते. या बदलामुळे घरगुती गणपतींबरोबरच गणेशमंडळांची मागणी पुरवतानाही गुरुजींना मोठी कसरत होत असते.

गेल्या आठवड्यापासूनच गुरूजींना प्रतिष्ठापनेच्या बुकिंगसाठी फोन सुरू झाले आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत एकत्र कुटुंबपद्धती असल्याने सगळ्या भावंडांत मिळून एकाच घरी गणपती बसत असे. अलिकडे प्रत्येक भाऊ वेगवेगळा राहत असले तरीसुद्धा या गणपतीच्या सणांच्या निमित्ताने एकत्रितपणे येऊन घरात गणेशोत्सव साजरा होतो आहे. त्यामुळे गणेशभक्त गुरुजींना प्राधान्य देत आहेत.

## रोह्यात अद्ययावत रुग्णालयाची गरज; नागरिकांची बैठकीत मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यात अद्ययावत रुग्णालय नसल्याने अपघातात गंभीर जखमी झालेली व्यक्तीला उपचार वेळेवर मिळत नाही. त्यामुळे अनेकदा व्यक्ती दगावले आहेत. औद्योगिक क्षेत्रात अनेकवेळा अपघात, स्फोट झाले आहेत. अशांना मुंबई येथे अधिक उपचारासाठी नेण्यात येत आहे. या वेळी मुंबई येथील रुग्णालय जाईपर्यंत रुग्ण दगावत आहेत. अशा घटना सातत्याने घडत आहेत. अशावेळी शहरात अद्यावत रुग्णसेवा नसल्याचे दिसून येत असल्याने रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात याविषयी चर्चा करण्यासाठी रोहेकरांनी बैठक बोलावली होती. या बैठकीत रोहेकरांनी वैद्यकीय सेवांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या वेळी भाजपचे युवा नेते अमित घाग व रोशन चापेकर यांनी मार्गदर्शन केले. रोह्यात दुर्दैवी घटना गुरुवारी घडली असून २१ वर्षीय युवक रेल्वेतून उतरताना पडल्याने त्याचा अपघात झाला होता.



या युवकाला वेळीस उपचार न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे रोह्यात अद्यावत रुग्णालयाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

यासंदर्भात विचार विनिमय करण्यासाठी रोहा शहरातील नागरिकांची बैठक रोहा शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत शासकीय रुग्णालयात अपुरी सुविधा मिळत आहेत. डॉक्टारांची कमतरता, संजय गांधी रुग्णालय का सुरू होत नाही. निवडणुकीत मते मागणारे आमदार, खासदार यांना जाब विचारण्याची आवश्यकता आहे. सरकारने आरोग्य सेवा देण्याची आवश्यकता आहे. स्थानिक नेतृत्वाने रोह्यात चांगले डॉ. आणण्यासाठी प्रवृत्त करावे. नागरिकांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात जाण्याची आवश्यकता आहे. यांसह अनेक मुद्दे रोहेकरांनी आपल्या सुचनेतून मांडले.

## नांदगाव येथील विद्यार्थ्यांसाठी साहित्यवाटपासह विविध स्पर्धा

**पाली : प्रतिनिधी**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे कर्तव्य चॅरिटेबल ट्रस्ट आणि सुधागड तालुका रहिवाशी सेवा संघ डोबिवली कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव विभागातील विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान चित्रकला स्पर्धा, अभियोग्यता चाचणी, वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना मॅजिक खेळ दाखवून वैज्ञानिक दृष्टिकोन वाढण्यास मदत केली. स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच स्पर्धेनुसार टिफिन, घड्याळ, डिक्शनरी, भेटवस्तू तसेच महाविजेते ठरलेले साहिल भिलारे आणि स्वरूपा शिंदे यांना सायकल देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे, कर्तव्य चॅरिटेबल ट्रस्ट एजीएम खुशबू गोयल, सदस्य जगदीश, अनिकेत, पीएसआय जीवडे, गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, प्राईड इंडिया मोरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश सुतार, प्राचार्य संभाजी ढोपे, सुधागड रहिवासी सेवा संघ डोबिवली कल्याण अध्यक्ष यशवंत कदम, सेक्रेटरी दिलीप धनावडे, नांदगाव केंद्रप्रमुख संजय थळे, शिक्षक उपस्थित होते.





**खोपोली : भारताचे लोकप्रिय व यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत खोपोली भारतीय जनता पक्षातर्फे ई-श्रम कार्डवाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांच्यासह शहरातील विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी शनिवारी (दि.१६) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण १७० चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून १,२२,५०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

## पाटणेश्वर बँकेची वार्षिक सभा उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

पाटणेश्वर बँकेच्या रौप्य महोत्सवी वाटचालीत ठेवीदार, खातेदार व कमर्चाऱ्यांचे मोलाचे योगदान असून स्पर्धेच्या युगात यापुढेही बँक प्रगतीपथावर वाटचाल करेल असा आत्मविश्वास बँकेच्या अध्यक्षा कौसल्या पाटील यांनी बँकेच्या २५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना केले. या सभेस उपाध्यक्ष वसंतराव आठवले, संचालक डॉ. दिनकर पाटील, तज्ज्ञ संचालक ॲड. प्रशांत पाटील, संचालिका प्रतिभा पाटील, शशिकांत भगत, रामनाथ पाटील, सीताराम पाटील, राजू वाडकर, जयवंत मढवी, मारुती कुन्हाडे व व्यवस्थापक बाळ उके हे उपस्थित होते.

या वेळी प्रास्ताविक व्यवस्थापक बाळ उके यांनी केले तर इतिवृत्त वाचन बँकेच्या कर्मचारी रुपाली पाटील यांनी केले. या वेळी सभासदांच्या सूचनांना व्यवस्थापक बाळ उके यांनी समर्पक उत्तरे देत शंकांचे निरसन केले. सभेपुढील ११ विषयांचे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आले. बँकेने २५ वर्षे पूर्ण झाल्याने रौप्य महोत्सवी वर्षाचा केक कापून आनंद साजरा करण्यात आला.


### माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता. माणगांव,जि.रायगड, पिनकोड ४०२१०४ Email- nagarapanchayatmangaon@gmail.com, फोन नं. ०२१४०-२६३०५६

जा.क्र./मानपं/जा.नि./१०७६/२०२३- २०२४ दिनांक १५/०९/२०२३

**जाहीर निविदा/जाहिर फेरनिविदा**

निम्नलिर्देशित कामाकरीता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धीतीने सिलबंद निविदा खाली नमुद कालावधी पर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमुद कालावधीपर्यंत लेखी स्वरूपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरून मिळू शकतील.

| अ.क्र | कामाचे नांव | कालावधी | इसारा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | माणगाव नगरपंचायतीचे विविध कामांसाठी जे.सी.बी., क्रेन, पोकलेन, ट्रक, डंपर, ट्रॅक्टर, इत्यादी वाहने व यंत्रसामुग्री पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१८/०९/२०२३ ते दि.२५/०९/२०२३ | ५,०००/- | ५००/- |
| २ | माणगाव नगरपंचायतीचे कार्यालयीन कामकाजासाठी वाहन पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१८/०९/२०२३ ते दि.२५/०९/२०२३ | ५,०००/- | ५००/- |
| ३ | माणगांव नगरपंचायत हददीतील रस्त्यावर ग्रीट पुरविणे व पसरवून देणे | दि.१८/०९/२०२३ ते दि. ०३/१०/२०२३ | २,०००/- | ५००/- |
| ४ | काळनदी स्मशानभुमी माणगांव येथे शेड बांधकाम करणे. | दि.१८/०९/२०२३ ते दि. ०३/१०/२०२३ | २,०००/- | ५००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील कामांच्या निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

**सही/-** मुख्याधिकारी माणगांव नगरपंचायत | **सही/-** उपनगराध्यक्ष माणगांव नगरपंचायत | **सही/-** नगराध्यक्ष माणगांव नगरपंचायत



सिडको शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस सर्व . **श्री. रतन जगन्नाथ भगत, राहणार -रा. शेलघर, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०८**

-------- **(अर्जदार)**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखित २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. ऐव्हीयाना इंन्फ्रा एल एल पी तर्फे भागीदार १) गोविंद करमन गजोरा २) दिपेश गोविंद गजोरा ३) संतोष दत्तू पाटील ४) पार्थ गोविंद गजोरा, पत्ता- शॉप नं ०९, प्लॉट नं ३सी, सेक्टर १५ नेरूळ नवी मुंबई** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता **"ना हरकत प्रमाणपत्रासाठी"** मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| १९४१ | ०१/०९/२०२३ | पुष्पक नोड | २६ | ३४९ | ३७४०चौ.मी. पैकी ३७४ चौ. मी. | ०७.०८.२०२० | ०६.१०.२०२० |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरुपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(श्री. संभाजी ई. अडकुणे)**
**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/३०८/२०२३-२४



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस आमचे अशिलांतर्फे जाहीर हरकत नोटीस देण्यात येते. की, मौजे – नानोशी ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदी करण्याबाबत आवश्यक ते करारनामे केले असुन संबधित जमिन मालकांना ठरल्या प्रमाणे मोबदला दिलेला आहे. सदर जमिन विक्री परवानगीसाठी प्रकरण शासनाकडे सादर केले आहे. असे असताना काही तथाकथीत दलाल मुळ जमिन मालकांचा गैर समज करुन व त्यांना जादा मोबदल्याचा अमिष दाखवुन सदर जमिन मिळकतीचा व्यवहार काही त्रयस्थ खरेदीदारांबरोबर करीत असल्याचे आमचे अशिलांना समजले आहे. सदर जमिन मिळकतीचा असा कोणताही खरेदी विक्रीचा व्यवहार कोणीही केल्यास त्यास आमचे अशिलांची तिव्र हरकत राहील. तसेच असा केलेला कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच आमचे अशिलांचे कोणतेही कायदेशीर हक्क व अधिकारास बाधा येणार नाही. सदर जमिन खरेदीचा आमचे अशिलांचा कायदेशीर अधिकार काहीही झाले तरी अबाधित राहील याची सर्वांनी समज घ्यावी. याउपर कोणी व्यवहार केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व नुकसानीस असा तथाकथीत खरेदीदार व दलाल जबाबदार राहुन आमचे अशिलांचे होणारे आर्थीक नुकसान भरुन देण्यास बांधील राहतील. तसेच व्यवहारा बाबत योग्य तो दिवाणी व फौजदारी खटला दाखल करण्याचे तयारीत आमचे अशील आहेत याची ही समज सर्वानी घ्यावी. तरी असा कोणताही प्रयत्न कोणी करु नये व करीत असल्यास तो ताबडतोब थांबवावा असे आमचे अशिलांतर्फे जाहीर करीत आहोत.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे – नानोशी ता. पनवेल जि. रायगड**

| अ.न. | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | जमिन धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | १८ | ० | ३-५८-० | चांगीबाई महादू भला |
| २. | २० | ० | ९-८१-० | पदमाकर महादू पारधी |
| ३. | ३५ | ० | ७-८५-० | मंगळी मधुकर चौधरी |
| ४. | ३६ | ० | ८-२५-० | भरत मंगळ्या पारधी |
| | | | | मानकुबाई धनाजी पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | आंबीबाई मंगळ्या पारधी |
| | | | | शोभा चंद्रकांत दरवडा |
| | | | | जयश्री साईनाथ भला |
| | | | | गोमा कमळ्या पारधी उर्फ दरवडा |
| | | | | प्रकाश काळुराम पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | आंबो कमळ्या पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | वसंत आंबो उर्फ आंब्या पारधी |
| | | | | जनाबाई बुधाजी ठाकरे |
| | | | | मंगीबाई आंबाजी पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | सुरेश आंबाजी पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | जनी कमळु वाघ |
| | | | | चांगुणी काळुराम कामठी |
| | | | | राधीका रामा चौधरी |
| | | | | अशोक माया पारधी |
| | | | | गजानन शंकर पारधी |
| | | | | प्रमोद माया पारधी |
| | | | | सुकेश शंकर पारधी |
| | | | | कान्ही बाळू ठाकरी उर्फ ठाकरे |
| | | | | जयमाला वान ढुमणे |
| | | | | संगीता बामा सप्रा |

**ठिकाण – पनवेल**
**दिनांक १२/०९/२०२३**

Sd/-
**Adv. ARUN KUMAR**
Enrolment No: 4334 / 95
Shop No. 8, NBC Complex, Plot No. 43, Sec -11, Behind Vishwa Kamal Hotel, Opp. Belapur Railway Station, CBD, Belapur, Navi Mumbai 400 614 ( m) - 81088 24002



Hon'ble Gunnal Judge Court
Adv. Asha Arunkumar Bhagat
Mobile No.8108355000
CMA - 1289/2023
N.D - 23.10.2023

### Public Notice

**IN THE COURT OF HON'BLE C.J. S. D., AT PANVEL**

CIVIL MISC. APP.NO. 1289/2023
Exhibit No.

Smt. Savita Mahipal Bist and others 2 Applicants

1. Smt. Savita Mahipal Bist
   Age 57 years Business-Housewife
2. Smt Indira Mahipal Bist
   Age 37 years Business-Service Applicants
3. Shri Ajay Mahipal Bist
   Age 36 years Business-Service
   All are residing at 404 Ganga Sagar Plot No.21 Sector 21 Kamothe Taluka Panvel District Raigad 410209

Versus

Nil Opponent

It is hereby informed to the public at large that Late Mahipal Jeetsingh Bist (Deceased) who died on 29/11/2019 at Kamothe and who is the hubdand of applicant no.I and father of applicant no 2 3. That he was the owner of the following property

**Schedule of the Property**

Apartment Ganga Sagar Room No. 404, 4th Floor, Sector No.21, Plot No.21 Kamothe Taluka Panvel District Raigad 410209, admeasuring area of 675.66 Sq Feet, Valuation of the property Rs.20,00,000/- (Rupees Twenty Lac Only) is bounded as below:-

And the Family Tree of deceased Late Mahipal Jeetsingh Bist is as below :-

Late Mahipal Jeetsingh Bist (Deceased)
↓
Late Ramadevi Jeetsingh Bist (Mother of Deceased)
↓
Smt Savita Mahipal Bist (Wife of Deceased)
↓ ↓
Smt Indira Mahipal Bist(Daughter) Shri Ajay Mahipal Bist(Son)

1. That, Late Mahipal Jeetsingh Bist had purchased the aforesaid property from CIDCO vide the Agreement for sale of flat between builder and deceseased on 9th October 2009 vide registration no. 6638/2009 for the total consideration of Rs. 20,00,000/-(Rupees Twenty Lac Only)

2. Schedule of the property of Late Mahipal Jeetsingh Bist is as below:-

**Schedule of the Property**

Apartment Ganga Sagar Room No. 404, 4 Floor, Sector No.21,Plot No.21 Kamothe Taluka Panvel District Raigad 410209,admeasuring area of 675.66 Sq Feet, Valuation of the property Rs.20,00,000/- (Rupees Twenty Lac Only) is bounded as below:-

On or Towards the East : Plot No.20.
On or Towards the West : Plot No.22.
On or Towards the South : Channel
On or Towards the North : 20 Meter Wide Road

3. That, the applicants states that after the death of deceseased they approached to the CIDCO office along with the death certificate of the deceseased but officers of the CIDCO stated that if the owner of the flat is death then applicants have to submit the heirship certificate from the Hon'ble Court, Therefore the applicants has to approach this Hon'ble Court to declare themselves as Legal Heirs of deceased Late Mahipal Jeetsingh Bist who died on 29/11/2019.

That, consequent on the death of deceased applicant being the sole legal heirs and/or the legal representative of the deceseased as per the Hindu Sucessation -ct 1956 as filed application u/s 2 of the Bombay Regulation -ct No. VIII of 1927 for being declared as the legal heirs of the deceseased in respect of the above said property.

Anbody having any claim, objection against, in to or upon the above said property or the applicants being declared as the legal heirs of the deceased in respect of the above said property shall notify the same in writing within 30 days from the date hereof along with the supporting documentary evidence to the Hon'ble Court. Failing which the heirship certificate will be issued in accordance with law.

**Date: 1419/23**
**Place: Panvel**

Court Stamp

By-order
Superintendent, Civil
Judge (SD) Panvel

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त पनवेल परिसरात विविध कार्यक्रम

## पंतप्रधान विश्र्वकर्मा योजनेचे प्रक्षेपण




**पनवेल : वार्ताहर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अठरा पगड जातींसाठी पंतप्रधान विर्श्वकर्मा योजना १५ ऑगस्ट रोजी जाहीर केली होती. या योजनेचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा तसेच विश्वकर्मा जयंती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवसाच्या दिनी रविवारी (दि. १७) स्वतः पंतप्रधान मोदींनी केला. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण माजी नगरसेवक तथा रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आले होते.

या वेळी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, ओबीसी युवा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे, सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते, व्हीजेएनटी सेलच्या प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाने, निता माळी, भारती एकलारे, श्वेता म्हात्रे, जोष्णा माळी, गीता रावल, महेश सरदेसाई, मनोज पाटील, विजय डिसोझा, चंद्रकांत मंजुळे, मधुकर उरणकर, रमेश टाक आणि पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकारी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर ओबीसी मोर्चाकडून मेरी माटी, मेरा देश या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



**कळंबोली : भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप कळंबोली मंडलच्या वतीने लाभार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, राजेंद्र शर्मा, बबन मुकादम, माजी नगरसेविका मोनिका महानावर, भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, सहकार सेल जिल्हाध्यक्ष अशोक मोठे, व्यापारी सेल जिल्हाध्यक्ष कमल कोठारी, सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, उपाध्यक्ष सुनील ढेम्बरे, संदीप म्हात्रे, प्रभाग अध्यक्ष प्रकाश शेलार, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, रामा महानावर, जनार्दन पाटील, महिला मोर्चा उपाध्यक्ष उमा राव, श्रीकांत ठाकूर, निशांत गिल, विष्णू गायकवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

## विश्वकर्मा योजना ओबीसीसाठी फायदेशीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओबीसीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या विर्श्वकर्मा योजनेचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा तसेच विश्वकर्मा जयंती व नरेंद्र मोदी यांचा वाढदिवसाच्या दिनी रविवारी स्वतः मोदीजींनी दिल्लीत केला. या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन पनवेल येथे आज करण्यात आले होते.



या वेळी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, ओबीसी युवा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे, सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते, व्हीजेएनटी सेलच्या प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाने, निता माळी, भारती एकलारे, श्वेता म्हात्रे, जोश्ना माळी, गीता रावल, महेश सरदेसाई, मनोज पाटील, विजय डिसोझा, चंद्रकांत मंजुळे, मधुकर उरणकर, रमेश टाक आणि पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## कळंबोलीत मार्केटचे उद्घाटन

**कळंबोली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांचा मार्गदर्शनाने व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रयत्नाने सेक्टर १४ कळंबोली रोडपाली येथे महापालिकाच्या माध्यमातून नवीन जय हनुमान भाजी व फळ मार्केटचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मूकादम, राजेंद्र शर्मा, माजी सभापती प्रमिला पाटील तसेच केशव यादव, मधुकर जठोत, विलास किठे, उदय गायकवाड, पवार साहेब, भरत अंकुशकर अनिल कडू, मनीष तिवारी आदी उपस्थित होते.

## इन्शुरन्स भरण्याच्या नावाखाली एकाची फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे खोटे सांगून घेतलेले पैसे इन्शुरन्स कंपनीमध्ये न भरता त्याचा अपहार केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेश सोनावणे हे नवीन पनवेल येथे राहत असून त्यांनी या पूर्वी मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीची विमा पॉलिसी विकत घेतली आहे. जानेवारी २०२३ मध्ये त्यांना डेव्हलपमेंट ऑफिसर मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीकडून बोलत असल्याचा फोन आला व एजेंट ला द्यावे लागणारे आत्तापर्यंतचे कमिशन तुम्ही एजंट डी ॲक्टिव्ह फॉर्म भरल्यास एजंट ला द्यावे लागणार नाही व ते तुम्हाला मिळेल असे सांगून त्यांना पॉलिसीची डिटेल्स मागितली यावर सोनावणे यांनी विश्वास ठेवून त्यांच्या व्हॉट्सअॅपवरती कागदपत्रे पाठवली.

यानंतर एकूण ३७ हजार ८१९ रुपये पाठवले व त्यानंतर सोनावणे आजारी पडल्याने त्यांना फोन केला नाही व त्यांना पैसे भरल्याची रिसीट प्राप्त झाली नाही. काही दिवसांनी त्यांना फोन केला असता तो फोन बंद लागू लागला. यातून आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी याबातची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात केली आहे.

## कामाला जातो सांगून एक जण बेपत्ता

**पनवेल :** एक पन्नास वर्षीय व्यक्ती राहत्या घरातून कामावर जातो असे सांगून घराबाहेर पडला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात केली आहे. संजय रामविलासिंग असे या व्यक्तीचे नाव असून उंची पाच फूट, अंगात निळ्या रंगाचा टीशर्ट व काळी फुल पॅन्ट आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोहवा. पवार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : भाजप युवा कार्यकर्ते डॉ. रोशन संजय पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : शिवानंद वृत्तपत्राचे संपादक तसेच पत्रकार संरक्षण समिती प्रदेश अध्यक्ष नंदकिशोर धोत्रे यांनी आरतीसंग्रह संपादित केला आहे. या आरतीसंग्रहाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका दर्शन भोईर, नंदकिशोर धोत्रे, नूतन धोत्रे, सुवर्णा ठाकूर, रवींद्र ठाकूर, गुरुनाथ जांभुळकर, संगीत जांभुळकर, मल्हारी पाटील, अजय शेडगे, विवेक पाटील, धीरेंद्र ठाकूर आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)



**पनवेल : भाजपच्या भटके विमुक्त आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी बबन बारगजे यांची नियुक्ती झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी सहकार सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अशोक मोटे, माऊली होळकर, मिलिंद कर्चे, हनुमंत रिठे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप उरण विधानसभा मतदारसंघ हद्दीतील नागरिकांसाठी डेरवली गोकुळ कॉम्प्लेक्स येथे मतदार नोंदणी मोहीम व नवीन आधार कार्ड नोंदणी तसेच दुरुस्ती शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचे आयोजक भाजप पळस्पे विभागीय सरचिटणीस रवी शेळके यांनी स्वागत केले. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील हेही उपस्थित होते.**

## कळंबोलीमध्ये पासपोर्ट आणि हॉलिडेज कार्यालय सुरू



**परेश ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन**

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली सेक्टर २० येथे वायब्रण्ट पासपोर्ट आणि हॉलिडेज हे कार्यलय नव्याने सुरू करण्यात आला आहे. या शॉपचे उदघाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. श्रद्धा देशमुख यांनी वायब्रण्ट पासपोर्ट आणि हॉलीडेजहे कार्यालय सुरू केला आहे. याबद्दल पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी श्रद्धा देशमुख यांचे अभिनंदन करत पुढील यशस्वी वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या.



कळंबोली सेक्टर २० येथे वायब्रण्ट पासपोर्ट आणि हॉलिडेज हे कार्यालय श्रद्धा देशमुख यांनी सुरू केले आहे. ट्रॅव्हल आणि टुरिझमच्या संबंधित चार वर्ष जुनी एजन्सी ट्रॅव्हल एजन्सी देऊ केलेल्या सेवा देशांतर्गत पॅकेज, आंतरराष्ट्रीय पॅकेज, विजा, तिकीट, निवास, प्रवास विमा, पासपोर्ट साहाय्य, विदेशी मुद्रा विनिमय अश्या सेवांचे कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

या वेळी माजी नगरसेवक अमर पाटील, भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, गिरीश जोशी, आरआरडब्लूए सचिव दीपक खस्तुरी, सूर्यकांत देशमुख, सनी अर्बट, अंकुर पाटील, विश्रुत भाटनगर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर विद्यालयाचा इंडियन स्वच्छता लीग रॅलीमध्ये सहभाग

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने रविवारी (दि. १७) सकाळी ७.३० वाजता पनवेल महापालिकातर्फे 'स्वच्छ अमृत महोत्सवानिमित्ताने' खारघरमध्ये उत्सव चौक ते ग्राम विकास भवन येथे आयोजित केलेल्या इंडियन स्वच्छता लीग रॅलीमध्ये सहभाग घेतला.

या रॅलीला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील तरुणींचा व तरुणांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचा मुख्य हेतू शहराच्या स्वछतेमध्ये तरूणांचा सहभाग वाढवा, शहराशी आपुलकीचे नाते निर्माण व्हावे दृष्टीने या उपक्रमांनिमित्ताने आज स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या इंडियन स्वच्छता लीगच्या' रॅलीमध्ये विविध महाविद्यालये, शाळा, विविध पर्यावरण संघटना, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या झाला तसेच या रॅलीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वय प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. करिष्मा कडव, प्रा. राजश्री म्हात्रे प्रा. प्रतीक्षा पाटील व प्रा. राहुल कांबळे यांनी सहकार्य केले.



## बौद्ध समाजातर्फे प्रकाश बिनेदार यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मी बौध्द समाजातील बांधवांची अनेक चांगली कामे केलेली आहेत आणि ती करीत राहीन, असे प्रतिपादन माजी नगरसेवक व नवनियुक्त भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सत्कारास उत्तर देताना केले.



बुध्दगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुध्द विहार यांच्या वतीने शनिवारी (दि. १६) नवीन पनवेल येथे संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. प्रकाश बिनेदार यांची भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

या वेळी अशोक मिसाळ, किसन ढेकळे, बिल्डर श्रीशेठ भंडारी, सुभाष कांबळे, सुरेश सोंडे, गुलाबराव सोरटे, प्रकाश सोनावले, सुजित खंडिझोड, अक्षय मिसाळ, रमेश धिवर आदी उपस्थित होते.

## सराईत आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पादचारी व्यक्तीस जबरी मारहाण करून त्याच्या हातातील चांदीचे कडे काढून घेऊन पसार झालेल्या सराईत आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

भंवरराम देवाणी (वय २५) हे रेल्वे स्टेशन परिसरातून पायी जात असताना सराईत आरोपी सुरज उर्फ बाबू वाघमारे (वय २२, रा. नवनाथ नगर) याने त्याला आपल्या जवळ बोलावून त्याला धमकावून तसेच हाता बुक्याने जबरी मारहाण केली.

यानंतर त्याच्या हातात असलेले जवळपास पाच हजार रुपये किमतीचे चांदीचे कडे काढून घेऊन तो पसार झाला. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच पोलिसांच्या पथकाने नवनाथ नगर परिसरात लपून बसलेल्या या आरोपीस सापळा रचून ताब्यात घेतले आहे. त्याच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# कामगारांच्या हक्कासाठी सदैव प्रयत्नशील

## भाजप नेते सुधीर घरत यांचे प्रतिपादन

### जेएनपीएत विश्वकर्मा जयंती उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

भारतीय मजदूर संघातर्फे विश्वकर्मा जयंती दिवस हा कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून जेएनपीटी जनरल कामगार संघटना व जेएनपीटी वर्कर्स युनियनतर्फे विश्वकर्मा जयंती निमित्ताने कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.




कंत्राटी कामगारांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळवून देतानाच, जे कामगार या मूलभूत अधिकारांपासून वंचित आहेत अशा असंघटित कामगारांना संघटित करून त्यांनासुद्धा त्यांचे हक्क मिळावेत याकरिता प्रयत्नशील रहावे लागेल. जेव्हा शेवटच्या घटकाला त्याचे मूलभूत अधिकार प्राप्त होतील तेव्हाच समृद्धराष्ट्र निर्माण होईल, असे विचार भारतीय पोर्ट अॅण्ड डॉक मजदूर महासंघचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष कामगार नेते सुधीर घरत यांनी कामगार मेळाव्यात व्यक्त केले.

या वेळी व्यासपीठावर भारतीय पोर्ट व डॉक मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, जेएनपीटीचे विश्वस्त रवींद्र पाटील, जनार्दन बंद, मधुकर पाटील, अनिल चिर्लेकर, सौ. मंजुळा म्हात्रे उपस्थित होते.

कामगार नेते सुरेश पाटील व रवींद्र पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. या वेळी भव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली. सारा परिसर हाती घेतलेल्या झेंड्यांनी भगवामय झाला होता. शोभायात्रेने मेळाव्याची सांगता झाली. या वेळी मोठ्या संख्येने कामगार वर्ग उपस्थित होता.

# शेल इंडिया मार्केट्सच्या सफाई कामगारांसाठी पगारवाढीचा करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा येथील शेल इंडिया मार्केट्स लिमिटेड येथे प्रिझम फेसिलिटीज मॅनेजमेंट सर्विसेस व जय भारतीय जनरल कामगार संघटना यांच्यामध्ये कामगारांच्या पगारवाढ व इतर सोयीसुविधांचा करार रविवारी (दि. १७) झाला. याबद्दल कामगारांनी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेतली.

या करारामुळे कामगारांना तीन वर्षांसाठी ११००० ते १३००० रुपये थेट पगारामध्ये वाढ करण्यात आली आहे. यासोबतच सर्व कामगारांना कुटुंबासह तीन लाखांची मेडिक्लेम पॉलिसी, सण उत्सवांसाठी २० हजार विना व्याज कर्ज, बोनस पूर्ण पगार आणि ५००० रुपये सानुग्रह अनुदान मिळणार आहे.

सफाई कामगारांसाठीचा ऐतिहासिक कराराबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांचे विशेष आभार कामगारांनी मानले आहेत. करारावेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, जयराम दरे, प्रदीप दरे, उत्तम म्हात्रे, अविनाश गायकर आदी उपस्थित होते.



## स्वच्छता रॅलीमध्ये बीसीटी विधी महाविद्यालयाचा सहभाग




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय, नवीन पनवेलच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने, प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एनएसएस मुख्य कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक प्रा. राघव शर्मा यांच्या पुढाकाराने भारतीय स्वच्छता लीग २.०मध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिकेने पालिका मुख्यालय ते वडाळे तलावापर्यंत स्वच्छता रॅलीचे आयोजन केले होते. महाविद्यालयातील एनएसएस स्वयंसेवकांनी रॅलीत सहभाग घेतला आणि स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करण्यास मदत केली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १६) रसायनशास्त्र विभागातर्फे ओझोन डे च्या निमित्ताने प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेचा प्रमुख उद्देश सायनशास्त्र विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना ओझोन दिवसाचं महत्व व ओझोनमुळे पृथ्वीवरील सजीव सृष्टीला कशाप्रकारे सुरक्षित ठेवलं जातं तसेच ओझोन डिफ्लेशनचे कारणे व परिणाम याविषयी माहिती व्हावी हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड गायकवाड यांनी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना या स्पर्धे साठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी उस्फूर्त असा प्रतिसाद दिला.



या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे (विभाग प्रमुख, रसायनशास्त्र विभाग) यांनी केले तसेच प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. डॉ. दीपिका हसीजा व प्रा. रूपाली नागरेकर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## कोपरखैरणे येथे नागरिकांना संरक्षणाचे धडे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैरणे सेक्टर ८ येथील एफ. जी. नाईक महाविद्यालय येथे गृह विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत येणाऱ्या नागरिक संरक्षण संचालनाच्या वतीने ११ ते १५ सप्टेंबर या कालावधीत ५ दिवसीय मूलभूत प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये नवी मुंबईतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



देशातील नागरिकांचे जीवित, मालमत्ता, उद्योगधंदे वसाहती इत्यादींचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने व शासकीय सहाय्याने उभारलेली व्यवस्था म्हणजे नागरिक संरक्षण दल आणि ह्याच नागरीक संरक्षण दलाचे पाच दिवसीय नागरिक संरक्षण प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या वेळी नवी मुंबईतील ४८ पेक्षा जास्त नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला व प्रशिक्षण पूर्ण केले. या प्रशिक्षणामध्ये प्रथम उपचार करणे, आग विझवणे, संकटग्रस्तांची सुटका करणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात आले.

या वेळी नागरिक संरक्षण (ठाणे) दलाचे सहायक उपनियंत्रक अनिल गावित, उपमुख्य क्षेत्ररक्षक कर्मवीर सिंग भुर्जी, विभागीय क्षेत्ररक्षक अरुण सातपुते, प्रमोदिनी जाधव, सतीश पावडे, वैभव जाधव आदी उपस्थित होते.

## पद्मश्री डॉ. रत्नाप्पा कुंभार यांची जयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशभक्त, संविधान सभेचे सचिव, पद्मश्री डॉ. रत्नाप्पा कुंभार (प्रजापती) यांची ११४ वी जयंती आणि प्रजापती समाज विकास मंडळ या सामाजिक संस्थेचा १९वा स्थापना दिवस संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांनी भक्तिभावाने व उत्साहात साजरा केला.

डॉ. रत्नाप्पा कुंभार यांच्या फोटोला श्रध्दांजली अर्पण केली. त्याचबरोबर संस्थेच्या कार्याला १९ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संस्थेच्या प्रगतीबाबत चर्चा केली. संघटनेच्या १९व्या स्थापना दिनी, राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस यांनी ५६ सुधारित कार्यकारी अधिकारी आणि सदस्यांची नवीन यादीदेखील जारी केली. बैठकीत सर्वानुमते ठरवण्यात आले की, आगामी प्रजापती समाज विकास मंडळ रजि. सामाजिक संस्थेचे १९ वे वार्षिक संमेलन रविवार ७ जानेवारी २०२४ रोजी नवीन पनवेल येथे होणार आहे.

या वेळी संस्थेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष सी. पी. प्रजापती, राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस विनोदकुमार प्रजापती, नवीन पनवेल शहर अध्यक्ष गोवर्धन प्रजापती, रामेश्वर प्रजापती, पूनम प्रजापती, गौरव, सरोज, राजेश प्रजापती, अंकित प्रजापती शत्रुघ्न, जयराम, शिवम आदी उपस्थित होते.

## आमदार गणेश नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त फळेवाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार गणेश नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त माता व बाल रुग्णालय बेलापूर या ठिकाणी प्रभाग क्रमांक १०१ प्रभाग मधील युवा नेते सुभाष गायकवाड आणि क्रमांक १०५ प्रभाग माजी नगरसेविका, राजेश्री कातकरी आणि क्रमांक १०६ रवींद्र म्हात्रे यांच्या वतीने रुग्णांना तसेच प्रभागातील वृद्ध महिलांना फळ वाटप करण्यात आले.

या वेळी प्रमोद जोशी, नारायण मुकादम, विज्ञान म्हात्रे, कुणाल म्हात्रे, सुरेख वर्मा, विठ्ठल गायकवाड, अभिजित सोनवणे, उमेश टोके आदी उपस्थित होते.





**पनवेल : केदार भगत मित्र परिवाराच्या गणपती आरतीसंग्रहाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहराध्यक्ष अनिल भगत, सरचिटणीस अमरिश मोकल, माजी उपमहापौर चारूशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, विकास घरत, माजी नगरसेविका निता माळी, शिवसेना शहर संघटक अभिजित साखरे, युवा नेते केदार भगत, पत्रकार संजय कदम तसेच नंदकिशोर धोत्रे, सुमित दसवते, हर्षद गडगे, योगेश साळवी, शेषनाथ गायकर, ब्रिजेश बहिरा, यज्ञेश पाटील, संतोष वर्तले, उज्ज्वल पाटील, कर्णा शेलार, प्रवीण मोहोकर, वामन कडू आदी उपस्थित होते.**





**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस भाजप उलवे नोड व हनुमान मंदिर समितीतर्फे साजरा करण्यात आला. या वेळी समिती अध्यक्ष अवधेश महतो, उपसरपंच अमर म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, योगिता भगत, निलेश खारकर, मौर्या व मंदिर समितीचे सर्व सर्व पदाधिकारी व भक्तगण उपस्थित होते.**



**पनवेल : बामणडोंगरी गावचे सुपुत्र अलंकार पदाजी म्हात्रे यांची पीएसआयपदी नियुक्ती झाली. त्याबद्दल त्यांचे वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, वहाळ गाव अध्यक्ष प्रवीण ठाकूर, बामणडोंगरी गाव उपाध्यक्ष दीपक गोंधळी, हरी घरत, मच्छींद्र कोळी आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

## लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात आजी-आजोबा दिन उत्साहात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका शाळा क्र. १ लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय येथे बुधवारी (दि. १३) आजी-आजोबा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांना आमंत्रित केले होते. उपस्थित आजी-आजोबांना औक्षण करून गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक अनुपमा डामरे यांनी सर्वांचे स्वागत करून मुलांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. काहींनी कवितांचे गायन करून वातावरण प्रसन्न करून टाकले.

या वेळी आजी- आजोबांचा संगीत खुर्ची खेळ घेण्यात आला. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मुले व सर्व शिक्षकवृंद समाधानी झाले. उपस्थितांपैकी काही आजी-आजोबांनी आपले मनोगत व्यक्त करून शाळेचे आभार मानले, तसेच आजी-आजोबा दिन साजरा केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## पळस्पे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पी.जे.बी. नॅशनल पब्लिक स्कूल, पळस्पे येथे प्रतिक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ बिझनेस एमराल्डस, मानसरोवर आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांच्या संयुक्त विद्यमाने, विद्यार्थी व पालकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल, सुश्रुषा हार्ट केअर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल पनवेल, मातोश्री हॉस्पिटल पनवेल, डेंटल हेल्थ डिपार्टमेंट एमजीएम कामोठे, स्वामी कृपा नर्सिंग होम कामोठे, कॅन्सर केअर कॉर्डिनेटर टीम एमओसी खांदा कॉलनी, इत्यादी हॉस्पिटल्स चे अनुभवी डॉक्टर त्यांच्या टीमसह सहभागी झाले होते. यात शुगर, इ सी जी, बी एम आई, डोळे, दात, सोनोग्राफी, कॅंसर डिटेक्शन इत्यादीची तपासणी करण्यात आली.

शाळेचे चेअरमन डॉ. जयंत भोईर, प्रार्थना भोईर, स्कूल मॅनेजमेंट कमिटी मेंबर्स, रोटरी क्लब प्रेसिडेंट, डॉ. दीपक खोत, व कमलेश अग्रवाल, दीपक पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका राजेश्री जगदाळे, सर्व शिक्षक आदी या वेळी उपस्थित होते. शिबिराला विद्यार्थी व पालकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. २६० लोकांची तपासणी करण्यात आली. १२० लहान विद्यार्थ्यांचीही तपासणी करण्यात आली.

## राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धा

# ‘सीकेटी’चे स्पर्धक चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

झारखंडची राजधानी रांची येथे झालेल्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील क्रीपाश्री शेट्टी व श्रावणी म्हात्रे यांनी रौप्य, तर रोहित मालविया याने कांस्यपदक जिंकले.





या सर्व स्पर्धकांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेत ‘सीकेटी’चा सिद्धेश तांडेल उपविजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा कार्यालय रायगड आणि पोलीस मुख्यालय नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोलीतील पोलीस मुख्यालय येथे झालेल्या मुंबई विभागस्तरीय (ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सद्धेश धनाजी तांडेल (अकरावी कला विभाग) याने उपविजेतेपद पटकाविले.



या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## डायमंड लीग
## भारताच्या नीरज चोप्राला उपविजेतेपद

**यूजीन (अमेरिका) : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राला डायमंड लीग स्पर्धेच्या अंतिम फेरीत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेच्या अंतिम फेरीत नीरजने ८३.८० मीटर लांब भाला फेकला, तर चेक प्रजासत्ताकच्या जेकब वाडलेचने ८४.२३ मीटर दूर भाला फेकून पहिले स्थान पटकाविले.

## व्हॉलीबॉल स्पर्धेत कर्जत येथील अभिनव प्रशालेचा संघ विजेता

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका पावसाळी क्रीडा महोत्सव अंतर्गत व्हॉलीबॉल स्पर्धा कर्जत शहरातील गुंडगे येथील गुड शेफर्ड शाळेत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत कर्जतमधील अभिनव प्रशालेच्या संघाने विजेतेपद पटकावले.

१७ वर्षीय वयोगटात व्हॉलीबॉल स्पर्धेचा अंतिम सामना कर्जत येथील अभिनव प्रशालेचा संघ आणि माथेरानमधील प्राचार्य शांताराम गवाणकर शाळेचा संघ यांच्यात झाला. या अटीतटीच्या सामन्यात कर्जतने माथेरान संघाचा पराभव करीत विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत माथेरान शाळेचा संघ पहिल्यांदा सहभागी झाला होता. स्वराज काळे, टेनिस बर्गे, निखिल केलगणे आणि अक्षय आखाडे या खेळाडूंनी आक्रमक खेळ करीत गवाणकर संघाला अंतिम सामन्यात पोहचवले होते, पण कर्जतच्या खेळाडूंनी त्यांच्याहून चांगला खेळ करीत बाजी मारली.

स्पर्धेत पंच म्हणून स्वप्नील नामदास, श्रीकांत चव्हाण, निशांत तिजोरे तर गुणलेखक म्हणून सुंदरलाल राठोड, सुनील कोळी, जाधव आणि शिवानंद यांनी जबाबदारी बजावली.



**मुंबई : जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत पदक मिळविल्याबद्दल माधुरी ज्ञानेश्वर भगत (कर्जत, रायगड) आणि आणि अक्षय कोणार्क (मुंबई) यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात गौरव केला. या वेळी आंतरराष्ट्रीय पदक विजेते पॉवरलिफ्टिंग खेळाडू तथा आमदार तमिल सेल्वन आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच संजय सरदेसाई उपस्थित होते.**

## सॉफ्ट टेनिस रायगड जिल्हा संघ जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य सॉफ्ट टेनिस असोसिएशन अंतर्गत लातूर जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आठवी ज्युनिअर गट राज्यस्तरीय मुले व मुली अजिंक्यपद स्पर्धा ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरदरम्यान लातूर येथे आयोजित करण्यात आली आहे. यासाठी रायगड जिल्ह्याचा ज्युनिअर मुले व मुली संघ निवडण्यात आला आहे.

दुसरी जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच खारघरमधील विश्वज्योत हायस्कूल व रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील सर्व सॉफ्ट टेनिस खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता. स्पर्धेचे उद्घाटन विश्वज्योत हायस्कूलच्या उपप्राचार्य वासंती स्वामी यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक हर्षल बाबर व सॉफ्ट टेनिस ऑफ महाराष्ट्रचे महासचिव रवींद्र सोनावणे यांच्या हस्ते झाले.

या अजिंक्यपद स्पर्धेतून निवड झालेले प्राविण्यप्राप्त खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेत रायगड जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

ज्युनिअर मुलींचा संघ

ज्युनिअर मुलांचा संघ




**असे आहेत संघ**

**ज्युनिअर मुले :** अश्विन प्रभू, राज बिसवास, स्पर्श पाटील, आदित्य मुंढे, आदित्य भाबड, प्रकाश गौतम, राज पिंगळे, सिद्धेश कारंडे.

**ज्युनिअर मुली :** इरा अयाथान, समीक्षा शेरकर, दीक्षा वलवे, श्रुती बोणे, दुर्वा गोरडे, दृष्टी अगरवाल, जीविका अरोरा, किर्ती अस्वले.

## मोहोपाड्यातील समृद्धी चव्हाणला अथॅलेक्टीक्समध्ये सुवर्णपदक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा अथॅलेक्टीक्स असोसिएशनची चॅम्पियनशिप स्पर्धा उलवे नोड येथे झाली. या स्पर्धेत गोळाफेकमध्ये मोहोपाडा येथील समृद्धी संजय चव्हाण हिने सुवर्णपदक पटकाविले. याशिवाय ग्रंथा मिलिंद पांगतने रौप्य आणि वैष्णवी पिल्ले हिने कांस्यपदक जिंकले. विशेष म्हणजे हे तिन्ही स्पर्धक रसायनी एचओसी इंटरनॅशनल महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

समृद्धी चव्हाणची राज्यस्तरीय अथॅलेक्टीक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ती प्रशिक्षक इंजमान यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. तिच्यासह मोहोपाडा परिसरातील पदक विजेत्या अन्य स्पर्धकांचे अभिनंदन होत आहे.



# व्हॉलिबॉल स्पर्धेत कोलाड हायस्कूलची बाजी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुकास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धा कोलाड येथील द. ग. तटकरे हायस्कूल येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत यजमान हायस्कूलने सर्वच्या सर्व वयोगटातील मुली व मुलांच्या अंतिम स्पर्धेत आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

१४, १७ व १९ वयोगटातील मुले व मुली प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरल्याने गेल्या १८ वर्षांचा इतिहास अबाधित राहिला. क्रीडा शिक्षक सदानंद तांडेल यांनी सलग अठरा वर्षे हा विक्रम केल्याने रोहा तालुक्यात त्यांचे कौतुक होत आहे. सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वसंत ओसवाल, कार्यवाह गीता पालरेचा, सचिव रविकांत घोसाळकर, राजेंद्र पालवे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



(छाया : जितेंद्र जाधव)

या वेळी आंबेवाडी सरपंच सुरेश महाबळे, सामाजिक कार्यकर्ते विलास बडवाईक, कोलाड हायस्कूलचे मुख्याध्यापक सुखदेव तिरमळे, क्रीडा समन्वयक रवींद्र कान्हेकर, क्रीडा शिक्षक थोरात, सुधीर जंगम, निलेश बिरगावले, गोविंद कवलगे, शिवाजी मेंढे, मंगेश कुर्ले, पाखर, राकेश म्हसकर, अश्विनी चव्हाण, संघ व्यवस्थापक, सहकारी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, एमपीएसएस कोलाड हायस्कूलने १४ व १७ वर्ष वयोगटातील मुले आणि मुले गटातील उपविजेतेपद पटकावले, तर १९ वर्ष वयोगटात मुलांमध्ये एम. बी. मोरे फाउंडेशन कला व वाणिज्य महाविद्यालयाने अटीतटीच्या अंतिम सामान्यात उपविजेतेपद पटकाविले.




## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी बुधवारी महाराष्ट्र खो खो संघनिवड चाचणी

**मुंबई : प्रतिनिधी**

३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा २५ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत गोवा येथे होणार आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राचे पुरुष व महिला खो खो संघ सहभागी होणार आहेत. त्याकरिता येत्या बुधवारी (दि. २०) सकाळी ८ वाजल्यापासून धाराशिव येथील श्री तुळजाभवानी क्रीडा संकुलात निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

उस्मानाबाद येथे ५५व्या पुरुष महिला राष्ट्रीय खो खो स्पर्धेत सहभागी झालेल्या महाराष्ट्र पुरुष व महिला संघातील खेळाडू तसेच हिंगोली येथे झालेल्या ५८व्या पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धेतील क्रमवारीतील पहिल्या एक ते चार जिल्हा संघटनांनी प्रत्येकी चार पुरुष व चार महिला, तर उर्वरित जिल्हा संघटनांनी प्रत्येकी दोन पुरुष व दोन महिला खेळाडू आपल्या शिफारस पत्रासह मैदान निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी पाठवावेत, असे महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस गोविंद शर्मा यांनी कळविले आहे.

निवड समितीचे सदस्य किशोर पाटील (ठाणे), सुरेंद्र विश्वकर्मा (मुंबई), विजय बनछोडे (नाशिक), डॉ वृषाली वारद (धाराशिव) हे महाराष्ट्राचा संघ निवडणार आहेत. अधिक माहितीसाठी प्रवीण बागल (९८५०६५०३७५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com